# नवीन नागरी कार्यसूची

Translation accuracy is not guaranteed nor implied. If any questions arise related to the accuracy of the information contained in the translation, please refer to the New Urban Agenda document endorsed by the General Assembly (A/RES/71/256*) which is the official version of the document. Any discrepancies or differences created in the translation are not binding and have no legal effect for compliance or enforcement purposes.

---

संयुक्त राष्ट्र सूचना केंद्र , भारत एवं भूटान द्वारा अनुवादित

# नवीन नागरी कार्यसूची

HABITAT III
QUITO 17-20 OCTOBER 2016
United Nations Conference on Housing and Sustainable Urban Development

United Nations

# नवीन नागरी कार्यसूची

# शाश्वत शहरे आणि सर्व मानव वसाहतींविषयी क्विटो घोषणापत्र

1. आम्ही राज्य आणि सरकारचे प्रमुख, मंत्री आणि उच्च प्रतिनिधि, संयुक्त राष्ट्रांच्या आवास आणि शाश्वत शहरी विकास (हॅबिटाट III) संबंधी कॉन्फरन्ससाठी 17 ते 20 ऑक्टोबर 2016 रोजी क्विटोमध्येएकत्र आलेलो आहोत, यात उप राष्ट्रीय आणि स्थानिक सरकार, सांसद, नागरी समाज, स्थानिक लोक आणि स्थानिक समुदाय, खाजगी क्षेत्र, व्यावसायिक, शास्त्रकार आणि शैक्षणिक समुदाय, त्याच बरोबर संबद्ध हितसंबंधी नवीन शहरी कार्यसूची स्वीकारण्यासाठी एकत्र आले आहेत.

2. वर्ष 2050 पर्यन्त, जगातील शहरी लोकसंख्या जवळपास दुप्पट होणे अपेक्षित आहे, त्यामुळे शहरीकरण हे एकवीसाव्या शतकातील सर्वात बदल घडवून आणणारी बाब ठरणार आहे. लोकसंख्या, आर्थिक गतिविधि, सामाजिक आणि सांस्कृतिक संवाद, त्याच बरोबर पर्यावरण आणि मानवीय प्रभाव शहरांमध्ये फार मोठया प्रमाणावर उच्च गतिने बदल घडवून आणत आहे, आणि यामुळे शाश्वतआवास, पायाभूत सुविधा, आधारभूत सेवा क्षेत्र, आरोग्य, शिक्षण, अन्न सुरक्षा, उत्तम नोकरी, सुरक्षा आणि नैसर्गिक स्रोत यांसह अनेक बाबींच्या दृष्टीने शाश्वततेच्या संबंधात मोठी आव्हाने समोर येत आहेत.

3. वर्ष 1976 मध्ये व्हँकुवर, कॅनडायेथे आणि वर्ष 1966 मध्ये इस्तंबूल, टर्की येथे झालेल्या मानव वसाहतींसंबंधी कॉन्फरन्स आणि 2000 मध्ये मिलेनियम डेवलपमेंट लक्ष्ये स्वीकारल्यापासून, आम्ही कोट्यावधी शहरी नागरिकांच्या जीवनात बदल घडताना पाहिले आहे आणि त्यात झोपड्या आणि अनौपचारिक वसाहतींमध्ये राहणारे लोक समाविष्ट आहेत. तथापि, दारिद्र्याची विविध रुपे, वाढ़ती विषमता आणि पर्यावरणाचा ह्रास झाल्यामुळे शाश्वत विकास वैश्विक रीत्या करण्यासाठी सुद्धा मोठे अजथळे आहेत, ज्यात बहुतेक वेळा शहरांत आणि मानवी वसाहतींत सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्य़ा वगळल्यामुळे आणि अवकाशीय वेगळेपणा हे नाकारता न येणारे वास्तव असणार आहे.वसाहती असणार आहे.

4. आपण अजूनही या आणि इतर अस्तित्वातील आणि उद्भवणाऱ्या आव्हानांना संबोधित करण्यापासून खूप दूर आहोत आणि आणि एक शाश्वत आणि उत्तम आर्थिक प्रगति, सामाजिक आणि सांस्कृतिक विकास आणि पर्यावरण सुरक्षा मिळवणे व त्या संबंधी त्यातील योगदान रेखांकित करावयाचे आहेत जे शाश्वत विकास संबंधी बदल

मिळवण्यात मदत करतात त्यासाठी इंजिन म्हणून शहरीकरणामुळे मिळत असलेल्या संधिचा वापर करणे आपल्याला गरजेचे आहे.

5. शहरे आणि मानवी वसाहती ज्या प्रकारे आरेखित, डिझाइन केल्या जातात, वित्तपुरवठा केला जातो, विकसित, शासित आणि व्यवस्थापित केल्या जातात त्या पद्धतींना पुन्हा संबोधित करून, नवीन शहरी कार्यसूची सर्व स्वरुपातील आणि आकारमानातील दारिद्र्य आणि भूक नष्ट करण्यात, विषमता कमी करण्यात टिकाऊ, सर्वसमावेशक आणि शाश्वत वृद्धीचे प्रवर्तन करण्यात, लिंग समानता निर्माण करण्यात आणि शाश्वत विकासात त्यांच्या महत्त्वाच्या योगदानाचा पूर्णपणे लाभ घेण्याच्या दृष्टीने महिला आणि मुलींच्या सक्षमीकरणात, मानवी आरोग्य आणि स्वास्थ्य सुधारण्यात, विरोधाला बळ देण्यात आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यात मदत करतील.

6. आम्ही वर्ष 2015 मध्ये मिळवलेले यश आम्ही पूर्णपणे विचारात घेतो. मुख्यत्वाने वर्ष 2030[1] संबंधी शाश्वत विकास बाबद असलेल्या कार्यविधी साठी, यात समाविष्ट आहेशाश्वत विकासशील लक्ष्य, तिसऱ्या जागतिक कॉन्फरन्सचा अदिस अबाबा[2] कृती कार्यसूची जी , विकासासाठी वित्त पुरवठा करण्यावर आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या हवामान परिवर्तनवरील संयुक्त राष्ट्रसंघाच्या फ्रेमवर्क कन्व्हेंशनखाली स्वीकारण्यात आलेला पॅरीस करार[3], आपत्तीदा जोखीम कमी करण्यासंबंधी सेन्डाई फ्रेमवर्क 2015-2030[4], व्हिएन्नाचा लँन्डलॉक्ड डेवलपिंग कन्ट्रीज फॉर द डिकेड 2014–2024 एक्शन प्रोग्राम,[5] सिड्स एक्सीलरेटेड मॉडेलिटीज ऑफ एक्शन (समोआ)[6] पाथवेज आणि इस्तंबूलमध्ये झालेली अविकसित देशांसाठी दशकाचा कृती आराखडा 2011-2020[7] समाविष्ट आहेत. आम्ही पर्यावरण

---

1 ठराव 70/1.

2 ठराव 69/313, अनुच्छेद.

3 बघा FCCC/CP/2015/10/Add.1, निर्णय 1/CP.21, अनुच्छेद.

4 रिझोल्यूशन 69/283, अनुच्छेद II.

5 रिझोल्यूशन 69/137, अनुच्छेद II.

6 रिझोल्यूशन 69/15, अनुच्छेद.

7 इस्तम्बूल, टर्की मध्ये झालेली शेवटची विकसित देशांची चौथी युनाईटेड नेशन्स कॉन्फरन्सचा अहवाल, 9–13 मे *2011* (A/CONF.219/7), अध्याय. II.

आणि विकास संबंधी रियो दि जेनेरियो जाहीरनामा,[8] आणि शाश्वत विकासावरील जागतिक शिखर परिषद, सामजिक विकासावरील जागतिक शिखर परिषद[9], लोकसंख्या आणि विकासावरील आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्सचा कृतीचा कार्यक्रम, बीजिंग प्लेटफॉर्म फॉर एक्शन[10], शाश्वत विकास संबंधी संयुक्त राष्ट्रसंघाची युनाइटेड नेशन्सची कॉन्फरन्स आणि या कॉन्फरन्सेसचा पाठपुरावा सुद्धा विचारात घेतला आहे,यासंबंधी पाठपुरावा.

7. यात अन्तर्सरकारी सहमत निष्पत्ती नाही हे मान्य करत असताना, आम्ही मे 2016 मध्ये इस्तंबूलमध्ये झालेल्या वर्ल्ड ह्युमेनिटेरियम सम्मिटची दखल घेतली.

8. नवीन शहरी कार्यसूचीतील राष्ट्रीय सरकारांची योगदाने, तसेच उपराष्ट्रीय आणि स्थानिक सरकारांची योगदाने यांचे कौतुक करतो आणि स्थानिक आणि प्रांतीय सरकारांच्या दुसऱ्या जागतिक सभेची नोंद घेणार.

9. जागतिक, प्रादेशिक, उपराष्ट्रीय आणि स्थानिक पातळयांवर, संबंधित कार्यकर्त्यांच्या सहभागासह एका एकात्मिक आणि समन्वयी पद्धतीने शाश्वत शहरी विकासाप्रती आमच्या जागतिक वचनबद्धतेचा नवीन शहरी कार्यसूची ठामपणे पुनरुच्चार करते. शाश्वत. नवीन शहरी कार्यसूचीची अंमलबजावणी एकात्मक पद्धतीने शाश्वत विकासासाठी 2030 कार्यसूचीच्या अंमलबजावणीत आणि स्थानिकीकरणात, आणि शहरे आणि मानवी वसाहती सर्वसमावेशक, सुरक्षित, तगाऊ आणि शाश्वत बनवण्याच्या गोल 11 सह, शाश्वत विकासाची लक्ष्ये आणि उद्दिष्टे साध्य करण्यात योगदान देते.


10. नवीन शहरी कार्यसूची हे मान्य करते कि संस्कृती आणि सांस्कृतिक विविधता मानव जमातीच्या समृद्धीचे स्रोत आहेत आणि शहरांच्या, मानवी वसाहतीच्या आणि

---

[8] यसंयुक्त राष्ट्रांच्या रियो डि जेनेरियो मध्ये झालेल्या पर्यावरण आणि विकास यावरील कॉन्फरन्सचा अहवाल *3-14* जून 1992, संस्करण. I, कॉन्फर्नसमध्ये मंजूर केलेले ठराव (युनाईटेड नेशन्स पब्लीकेशन्स, विक्री नं. E.93.I.8 आणि खण्ड), ठराव 1, अनुच्छेद I.

[9] लोकसंख्या व विकास यावरील इंडरनॅशनल कॉन्फरन्स, कैरो 5–13 सप्टेम्बर *1994* चा अहवाल (युनाईटेड नेशन्स पब्लिकेशन्स, सेल्स नं. E.95.XIII.18), अध्याय. I, ठराव 1, अनुच्छेद.

[10] चौथी महिलांवर आधारित विश्व कॉन्फ्रेन्स बीजिंग *4–15* सप्टेम्बर *1995* (युनाईटेड नेशन्स पब्लिकेशन्स, सेल्स न E.96.IV.13), अध्याय. I, ठराव 1, एनेक्स II.




New Delhi, India - Andrzej Wrotek ©

नागरिकांच्या शाश्वत विकासात महत्त्वपूर्ण योगदान देतात, ज्याद्वारे त्यांना विकासाच्या उपक्रमात सक्रिय आणि अद्वितीय भूमिका निभावण्यात सक्षम करतात. नवीन शहरी कार्यसूची विकास पुढे हे मान्य करतो कि स्रोतांच्या जबाबदार वापरात योगदान देणाऱ्या शाश्वत उपभोग आणि उत्पादनाच्या पद्धती यांच्या प्रवर्तनात आणि अंमलबजावणीत संस्कृतीचा विचार केला जावा आणि हवामान बदलाच्या विपरित परिणामांना संबोधित करावे.

## आमची सामायिक दृष्टि

11. समान वापर आणि शहरांचा आणि मानवी वसाहतींचा उपभोग याच्या संदर्भात आमच्याकडे सर्वांसाठी शहरांची सामायिक दृष्टी, यात सर्व प्रकार सामील असून उत्तम वसाहत, सद्य आणि पुढील पिढीसाठी सोय, कोणत्याही प्रकारचे भेदभावांशिवाय, एक उत्तम सुरक्षित, आरोग्यप्रद, सरळ जाण्यासारखे, कमी किमतीचे, लवचिक आणि शाश्वत प्रकारचे शहरी मानव वसाहतीचे स्वरुप तयार असावे आणि त्यात सर्वांसाठी उत्तम समृद्धि आणि जीवनाचा दर्जा असावा. ही दृष्टी साकार करण्यासाठी काही राष्ट्रीय आणि स्थानिक सरकार यांच्या प्रयासांची, ज्यांना त्यांच्या विधेयकांमध्ये, राजकीय जाहीरनाम्यात आणि सनदांमध्ये "शहरांचा हक्क" असे संदर्भित केले आहे त्यांची नोंद घेतो.

12. आमचे लक्ष्य आहे शहर आणि मानव वसाहती संबंधी कार्य ज्यात प्रत्येक व्यक्तिला, आंतरराष्ट्रीय कायद्यांप्रती संपूर्ण आदरासह संयुक्त राष्ट्रांच्या सनदेच्या हेतू आणमि तत्त्वांनी मार्गदर्शन केलेले समानतेचे अधिकार आणि संधि त्याच बरोबर त्यांना आधारभूत स्वातंत्र्य मिळू शकतील. या संबंधात, नवीन शहरी कार्यसूची युनिवर्सल डिक्लरेशन ऑफ ह्युमन राइट्स,[11] जागतिक मानवाधिकार संधि, मिलेयेनियम डिक्लरेशन[12] आणि 2005 वैश्विक समिटचे[13] परिणाम यामध्ये अंतर्भूत आहे. विकासाच्या हक्कावरील जाहीरनाम्या[14] सारख्या इतर विलेखातून सुद्धा याची माहिती दिली जाते.

---

[11] ठराव 217 A (III).

[12] ठराव 55/2.

[13] ठराव 60/1.

[14] ठराव 41/128, अनुच्छेद

13. आमची शहर आणि मानव वसाहतींची परिकल्पना अशी आहे कीः

(a) ते आपल्या सामाजिक कार्याचे पालन करु शकतील, यात समाविष्ट आहे आहे सामाजिक आणि निसर्गविषयक कार्य ज्यात भूमि समाविष्ट असून यासंबंधी प्रगतिवादी उपलब्धि मिळवणे आणि आवास संबंधी अधिकारांचा पूर्ण वापर आणि सन्मान करताना यात बरोबर जीवन स्तर, कोणत्याही भेदभावाशिवाय, वैश्विक रीत्या सुरक्षित आणि कमी दरातील पिण्याचे पाणी आणि स्वच्छता, त्याच बरोबर सार्वजनिक वस्तू आणि सेवा, यासंबंधी सहज पोहोच यथा आहार सुरक्षा आणि पोषण, आरोग्य, शिक्षा, पायाभूत सुविधा, चलनवलन आणि वाहतुक, ऊर्जा, हवेची गुणवत्ता आणि उदरनिर्वाह समाविष्ट आहे.

(b) एक सहभागी म्हणून, त्यातील सर्व रहिवाशांची नागरी गुंतवणूक वाढवणे, स्वामित्व संबंधी भावना सर्वात निर्माण करणे, सुरक्षित, सर्वसमावेशक, पोहोच योग्य, हरित आणि पर्यावरण मित्र व गुणवत्तापूर्ण सार्वजनिक स्थळे सर्वांना मिळतील हे प्राधान्याने ठरवणे, त्याच बरोबर हे स्थळ सर्व कुटुंबांसाठी बरोबर असून सामाजिक आणि पिढ्यापिढ्यांमधील संवादाचे केन्द्र, सांस्कृतिक अभिव्यक्ति आणि राजकीय सहभाग, उचित असल्याप्रमाणे उपयोगात आणणार, त्याच प्रकारे सामाजिक ळावा, सुरक्षा आणि शांति स्वरुपात विविध समाजांची उपस्थिति, ज्या ठिकाणी सर्व लोकांच्या गरजा पूर्ण होतील विशेष करुन ते, ज्यांना वैशिष्ट्यपूर्ण गरजा असतील.

(c) लैंगिक समानता ज्यामुळे सर्व स्त्रिया आणि मुलींना सर्व क्षेत्रात बरोबरीने सहभागी होता येईल आणि समान हक्क प्रत्येक क्षेत्रात नेतृत्व क्षमतेसोबत निर्णय क्षमता, उत्तम कार्य वातावरण आणि समान कामासाठी किंवा समान मूल्याच्या कामासाठी समान वेतन सर्वांना मिळवता येईल. सर्व स्त्रियांना कोणत्याही भेदभाव, हिंसा किंवा शोषण यापासून खाजगी आणि सार्वजनिक स्थळांवर सुरक्षित ठेवणे, हा सुद्धा महत्वाचा मुद्दा आहे.

(d) आव्हानांना समोर जाणे आणि सद्य व भविष्यातील संधिंचा वापर करणे, यात समाविष्ट आहे आर्थिक प्रगति, शहरीकरण आणि पायाभूत परिवर्तन, उत्तम उत्पादकता, मूल्य आधारित गतिविधि आणि स्रोतांचा उत्तम वापर, स्थानिक

अर्थव्यवस्थेला उत्तम दर्जा देणे आणि अनौपचारिक अर्थव्यवस्थेला मदत करुन शाश्वत स्वरुपाने औपचारिक अर्थव्यवस्थेचे रुप देणे.

(e) स्थानिक आणि स्थळासंबंधी कार्य पूर्ण करणे ज्यात व्यवस्थापना संबंधी सीमा येते आणि सर्वांसाठी एक समतोल साधणारा, शाश्वत आणि एकात्मिक शहरी आणि क्षेत्रीय विकास, सर्व स्तरांवर सुरु ठेवणे.

(f) वय आणि लैंगिक प्रतिसादात्मक नियोजन आणि शाश्वत, सुरक्षित आणि पोहोच करण्यात सरळ असलेले शहरी कार्य संबंधी गुंतवणूक ज्यात समाविष्ट असेल उत्तम आणि सक्षम परिवहन तंत्र ज्यात यात्री आणि सामान, प्रभावी प्रकारे लोकांशी जोडून स्थळ, सामान, सेवा आणि आर्थिक संधि समाविष्ट आहे.

(g) आपत्तीची जोखीम कमी करण्यासाठी उत्तम व्यवस्था करणे, जोखीम कमी करणे, अवरोध वाढवणे आणि नैसर्गिक पासून मानव निर्मित जोखीम कमी करणे आणि हवामानातील बदल सौम्य करणे आणि त्यांच्याशी जुळवून घेणे;

(h) त्यांची इकोसिस्टम, जल, नैसर्गिक वसाहती यांना सुरक्षा देणे, वाचवणे, पुनर्स्थापित करणे आणि वाढवणे आणि जैव विविधता वाढवून त्यांचे पर्यावरण संबंधी प्रभाव कमी करता शाश्वत उपभोग आणि उत्पादन पद्धतींच्या अनुषंगाने काम करणे.

## आमची तत्त्वे आणि वचनबद्धता

14. आमचे लक्ष्य प्राप्त करण्यासाठी, आम्ही पुढील इंटरलिंक्ड तत्त्वांचे अनुसरण करून नवीन शहरी कार्यसूची स्वीकारण्याचा निश्चय करतो:

(a) कोणालाही मागे ठेवायचे नाही, टोकाचे दारिद्र्य नष्ट करण्यासाह सर्व स्वरुपातील आणि आकारमानातील दारिद्र्य समाप्त करूनसमान हक्क आणि संधि, सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक विविधता, आणि शहरी अवकाशात सामावून घेणे लक्ष्यात समाविष्ट आहे आणि त्यासाठी उपजीविका,

शिक्षण, अन्न सुरक्षा आणि पोषण, आरोग्य आणि स्वास्थ्य ज्यात एड्स पासून मुक्ति, क्षय आणि मलेरियापासून बचाव समाविष्ट आहे, आणि भेदभाव आणि सर्व प्रकारची हिंसा नष्ट करणेआणि त्यासाठी लोकसहभागसुनिश्चित करणे व सुरक्षित आणि समान पोहोच सर्वांना देणे गरजेचे राहील ज्यात भौतिक आणि सामाजिक संरचना आणि आधारभूत सेवा समाविष्ट आहे त्याच बरोबर कमी किमतीत निवास सोय सुद्धा असेल.

(b) शाश्वत आणि सर्वसमावेशक असलेल्या शहरी अर्थव्यवस्था सुनिश्चित करणे ज्यासाठी संचयित पदोन्नती संबंधी फायदे जे सुनियोजित शहरीकरणासाठी असतात, ठेवणे गरजेचे आहे, यात समाविष्ट आहे उच्च उत्पादकता, स्पर्धात्मकता आणि कल्पकता यासाठी परिपूर्ण आणि उत्पादक रोजगार सृजन करणे व सर्वांसाठी सन्माननीय कामाची संधि देणे या कामात समाविष्ट आहे आणि त्यासाठी आर्थिक आणि उत्पादक स्रोतांचा वापर करणे आणि सर्वांसाठी संधि तयार करणे महत्वाचे आहे ज्यासाठी जमीनीच्या संबंधातील हवाला रोखणे, सुरक्षित जमीन अवधि तयार करणे आणि जिथे उचित असेल तिथे शहरी संकोचन रोखणे याची खात्री करणे.

(c) स्वच्छ ऊर्जेचे आणि शहरी विकासात जमीन आणि स्रोतांचा शाश्वत उपयोग करण्याचे प्रवर्तन करून, निसर्गाशी सुसंवाद राखून निरोगी जीवनशैली स्वीकारण्यासह इकोसिस्टीम आणि जैवविवधतेचे संरक्षण करून, शाश्वत उपभोग आणि उत्पादन पद्धतींचे प्रवर्तन करून, शहरी अवरोध उभारून ,आपत्तीच्या जोखमी कमी करून आणि हवामानातील बदल सोम्य करून आणि त्यांच्याशी जुळवून घेऊन पर्यावरण संबंधी शाश्वत स्थितीची सुनिश्चितता करणे

15. आम्ही स्वत:ला एका नवीन शहरी कार्यसूचीसाठी आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी वचनबद्ध करत आहोत जो करेलः

(a) आम्ही सर्वांसाठी शाश्वत विकास आणि समृद्धीचे साध्य प्रकाप्त करण्यासाठी शाश्वत शहरी आणि प्रांतीय विकास अत्यावश्यक आहे हे मान्य करून शहरे आणि मानवी वसाहतींचे च्या नियोजन करतो, वित्तपुरवठा करतो, विकास करतो, शासन करतो आणि व्यवस्थापन करतो त्या पद्धतींना पुन्हा संबोधित करणे.

(b) शाश्वत शहरी विकासासाठी सर्वसमावेशक आणि प्रभावी शहरी धोरणे आणि विधेयके यांच्या व्याख्येत आणि अंमलबजावणीत उचित असल्याप्रमाणे राष्ट्रीय सरकारांची आघाडीची भूमिका, तेवढेच महत्तावचे उपराष्ट्रीय आणि स्थानिक सरकारांचे तसेच, नागरी समाजाचे आणि इतर संबंधित हितसंबंधियांचे, एका पारदर्शक आणि उत्तरदायी पद्धतीत योगदान ओळखणे.

(c) परिवर्तनाच्या मूलभूत प्रेरणांच्या आधारे, सर्व पातळयांवर धोरणे,पवित्रे, क्षमता विकास आणि कृतींची अंमबजावणी करून शहरी आणि प्रांतीय विकासाप्रती एक शाश्वत, जन-केंद्रीत, वय - आणि लिंग - प्रतिसादात्मक आणि एकात्मिक दृष्टीकोन स्वीकारणे.ज्यात समाविष्ट असेल:

(i) उचित पातळीवर शहरी धोरणे विकसित करणे आणि अंमलबजावणी करणे, यात समाविष्ट आहे स्थानिक राष्ट्रीय आणि विविध हितसंबंधियांची भागीदारी, शहरांच्या आणि मानवी वसाहतींच्या एकात्मिक यंत्रणा उभारणे आणि आणि एकात्मिक शहरी विकास साध्य करणे शक्य होण्यासाठी सर्व सरकारी स्तरांमध्ये सहकार्याचे प्रवर्तन करणे.

(ii) शहरी हितसंबंधियांना सक्षम करतील अशा सुदृढ संस्था आणि यंत्रणांसह, त्याचप्रमाणे उचित बंधने आणि समतोलासह शहरी सरकार मजबूत करून सामाजिक सर्वसमावेशकता, टिकाऊ, सर्वसमावेशक आणि शाश्वत आर्थिक वृद्धी आणि पर्यावरणविषयक संरक्षम पुरवणेसुसंगतता.

(iii) दीर्घावधी आणि एकात्मिक शहरी आणि प्रांतीय नियोजनाला पुन्हा ऊर्जा देणे आणि शहरी विकास संबंधी लवचिकतेचे आयाम मिळवणे, त्यासाठी शहरीकरणाचे सकारात्मक बिन्दु मिळवणे आणि त्याबद्दल जागरुकता पसरवणे.

(iv) प्रभावी प्रकारे मदत करणे, कल्पक आणि शाश्वत वित्तीय फ्रेमवर्कवर काम करणे आणि नगरीय वित्त पुरवठा सुदृढ करणे त्याच बरोबर स्थानीय आर्थिक पद्धतीला सुद्धा नवीन करुन त्यास शाश्वत प्रकारे प्रगतिवादी स्वरुप देऊन एक शाश्वत शहरी विकास संबंधी विचाराचे मूल्य निर्माण करणे.

## कृतिसाठी आव्हान

16. शहरांच्या विशिष्ट परिस्थितिप्रमाणे, यात नगर आणि गाव वेगळे असू शकतील, तरीही आमचा ठामपणे सांगतो कि नवीन शहरी कार्यसूचीचा आवाका वैश्विक, सहभागी आणि जन-केंद्रीत आहे, ग्रहाची सुरक्षा करतो आणि यातील लक्ष्य दीर्घावधी आहे, आपल्या प्राथमिकता जागतिक, क्षेत्रीय, राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक स्तरावर ठेवाव्या ज्यामुळे सरकार आणि बाकी संबद्ध हितसंबंधी या गरजांना निभावू शकतील.

17. आम्ही नवीन शहरी कार्यसूची आमच्या स्वतःच्या देशांत आणि प्रांतीय आणि दागतिक स्तरावर, विविध राष्ट्रीय वास्तवे, क्षमता आणि विकासाच्या पातळया विचारात घेऊन, आणि राष्ट्रीय कायदे आणि पद्धती, तसेच धोरमे आणि प्राधान्यता यांचा आदर करून अंमलात आणण्यासाठी काम करू.

18. आम्ही पर्यावरण आणि विकासावरील रियो जाहीरनाम्याच्या, इतर विषयांबरोबरच तत्त्व ७ मध्ये ठरवून दिल्याप्रमाणे सामायिक परंतु वेगवेगळया जबाबदाऱ्यांसह, तत्त्वांवर पुन्हा एकदा विश्वास व्यक्त करतो.

19. आम्ही हे मान्य करतो कि नवीन शहरी कार्यसूची लागू करताना, आफ्रीकी देश, कमी विकसित देश, लैन्डलॉक विकनसशील देश आणि लहान बेटांचे विकसनशील देश आणि काही विशेष आव्हानांना सामोरे जाणारे मध्यम उत्पन्न देश यांना सानोरे जावेलागत असलेल्या अद्वितीय आणि उद्भवणाऱ्या शहरी विकासाच्या आव्हानांना संबोधित करण्याकडे विशेष लक्ष पुरविण्यात यावे. संघर्षाच्या परिस्थितीत असणाऱ्या तसेच विदेशांच्या ताब्यात असणाऱ्या, संघर्षोत्तर देश आणि नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींनी बाधित देशांकडे सुद्धा विशेष लक्ष देण्यात यावे.

20. आम्ही ही गरज मान्य करतो कि इतर बाबींबरोबरच, महिला आणि मुली, बालके आणि तरुण, अपंगत्व असलेल्या व्यक्ती,एचआयव्ही/एडससह जगणाऱ्या व्यक्ती, वयोवृद्ध व्यक्ती, देशांतर्गत लोक आणि स्थानिक समुदाय, झोपडी आणि अनौपचारिक वसाहतीतील रहिवासी, बेघर लोक, कामगार, अल्प भू-धारक शेतकरी आणि कोळी, निर्वासित, परतलेले, अंतर्गत विस्थापित लोक आणि स्थलांतरणाच्या स्थितीचा विचार न करता स्थलांतरित या सर्वांना साममोरे जावे लागत असलेल्या अनेक स्वरुपातील भेदभावांना संबोधित करताना विशेष लक्ष देण्याची आहे.

21. आम्ही सर्व राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक सरकार, त्याच बरोबर संबद्ध हितसंबंधियांना आव्हान करतो की नवीन शहरी कार्यसूची प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी आणि आपली सामायिक दूरदृष्टी वास्तावातत उतरवण्यासाठी त्यांनी राष्ट्रीय धोरणे आणि कायद्यांच्या अनुषंगाने, पुनर्निमाण करणे, सक्षम करणे आणि भागीदारी निर्माण करणे, समन्वय आणि सहकार्य वाढवणे यात उत्तम साथ द्यावी.

22. शाश्वत शहरी विकासाचे प्रवर्तन करणे आणि वास्तवात आणणे यासाठी आम्ही ही नवीन शहरी कार्यसूची, एक सामूहिक दृष्टी आणि राजकीय वचनबद्धता, आणि वाढते शहरीकरण होणाऱ्या जगातील शाश्वत प्रेरणा म्हणून शहरे आणि मानवी वसाहतींच्या मुख्य भूमिकेला बळ देण्याची एक ऐतिहासिक संधि म्हणून स्वीकारतो.

# नवीन शहरी कार्यसूचीसाठी क्विटो अंमलबजावणी आराखडा

23. राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक सरकार आणि सर्व संबद्ध हितसंबंधियांसाठी शहरी शाश्वत विकास साध्य करणे शक्य करण्यासाठी आम्ही नवीन शहरी कार्यसूचीची एक महत्त्वाचे साधन म्हणून अंमलबजावणी करण्याचा निश्चय करतो.

### शाश्वत नागरी विकासासाठी संक्रमणशील वचनबद्धता

24. शाश्वत शहरी विकासातील मूलभूत क्षमतांचा पुरेपूर फायदा मिळवण्यासाठी, शाश्वत विकासाच्या एकात्मिक आणि अविभाज्य परीसीमाःसामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणविषयक, मध्ये झालेल्या आमूलाग्र शहरी परावर्तनामार्फत आम्ही खालील संक्रमणशील वचने देतो.

### सामाजिक सर्वसमावेशकता सुसंगतता आणि दारिद्र्य निर्मूलनासाठीशाश्वत शहरी विकास

25. आम्ही हे मान्य करतो कि दारिद्र्याचे, टोकाच्या दारिद्र्यासह, त्याच्या सर्व स्वरुपातून आणि व्याप्तीतून निर्मूलन करणे हे सर्वात मोठे जागतिक आव्हान आहे आणि शाश्वत विकासासाठी अटळ आवश्यकता आहे. आम्ही हे सुद्धा मान्य करतो कि वाढत्या झोपडपट्टी आणि अनौपचारिक निवासींच्या वाढीसह वाढती विषमता, विकसित आणि विकासशील, दोन्ही प्रकारच्या देशांना प्रभावीत करत आहे, आणि की शहरी जागेचे अवकाशीय संघटन, पोहोच आणि डिझाइन, तसेच विकासाच्या धोरणांच्या जोडीने संरचना आणि पायाभूत सेवा, सामजिक सुसंगतता, समता आणि सर्वसमावेशकतेचे प्रवर्तन करू शकतील किंवा अडथळा आणू शकतील.

26. जन-केंद्रीत असलेला, ग्रहाचे संरक्षण करणारा, आणि वय- आणि लिंग प्रतिसादात्मक असलेला आणि सर्व मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्ये वास्तवात आणणारा, एकत्र राहणे सुविधाजनक करणार, सर्व प्रकारचा भेदभाव आणि हिंसा समाप्त करणारा, आणि सर्व व्यक्ती आणि समुदायांना त्यांचा परिपूर्ण आणि अर्थपूर्ण सहभाग शक्य करत सक्षम करणारा अशा शहरी आणि ग्रामीण विकासाप्रती आम्ही पूर्णपणे वचनबद्ध आहोत. त्यापुढे आपली शहरे आणि मानवी वसाहती यांच्या मानवीकरणातील महत्त्वाचे घटक म्हणून संस्कृती आणि विविधता आणि समतेप्रती आदराचे प्रवर्तन करण्यासाठीही आम्ही वचनबद्ध आहोत.

27. आम्ही आमची शपथ पुन्हा दृढतेने उच्चारतो की कोणीही मागे राहाणार नाही आणि सन्माननयी, प्रतिष्ठेचे आणि सुखाचे आयुष्य जगण्यासाठी आणि त्यांच्या पूर्ण मानवी मूलभूत क्षमता साध्य करण्यासाठी समान संधि आणि सर्व रहिवाशांना, औपपचारिक किंवा अनौपतारिक वसाहतींत राहणारे असोत, शहरीकरणामुळे होऊ शकणाऱ्या फायद्यांचे प्रवर्तन करण्याप्रती वचनबद्ध आहोत.

28. आम्ही वचनबद्ध आहोत कि निर्वासितांच्या, अंतर्गत विस्थापित व्यक्ती आणि स्थलांतरितांचे, त्यांच्या स्थलांतरणाच्या स्थितीचा विचार न करता, मानवी हक्कांचा पूर्णपणे आदर करण्याची खात्री करण्याप्रती आणि राष्ट्रीय परिस्थिती विचारात घेऊन त्यांच्या यजमान शहरांना आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या भावनेतून मदत देण्यासाठी, जरी शहरांत आणि नगरांत मोठ्या संख्येने स्थलांतरित होणारी लोकसंख्या विविध प्रकारची आव्हाने उभी करत असली तरीही ती शहरी जीवनात मोठ्या प्रमाणात सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक योगदानेसुद्धा देऊ शकेल. आम्ही त्यापुढे नियोजित आणि सुव्यवस्थापित स्थलांतर धोरणांमार्फत सुरक्षित, पद्धतशीर आणि नियमित स्थलांतराद्वारे जागतिक, प्रांतीय, राष्ट्रीय, उपराराष्ट्रीय आणि स्थानिक पातळयांवरील विकासांच्या दरम्यानच्या संयुक्त शक्तीला मजबूत करण्याला आणि स्थलांतरितांकडून शहरांना सकारात्मक योगदान शक्य करणारे फ्रेमवर्क स्थापित करण्यात स्थानिक प्राधीकरणांना पाठबळ पुरवण्याला आणि शहरी-ग्रामीण दुवे मजबूत करण्याला वचनबद्ध आहोत.

29. राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक सरकारची, उचित असल्याप्रमाणे, समन्वयी भूमिका मजबूत करण्याला आणि त्यांच्या सार्वजनिक एककांबरोबर आणि गैर सरकारी संगटनांसाठी सामाजिक आणि आधारभूत सेवा देणार, यात समाविष्ट असतील समुदायांमधील गुंतवणूकी ज्या आपत्तींना बळी पडणे सर्वात जास्त शक्य असते आणि जे वारंवार आणि प्रदीर्घ मानवताविषयक आपत्तींनी बाधित असतात. यापुढे आम्ही शहरी रचनेत आपत्तीग्रस्त व्यक्तींसाठी पुरेशा सेवा, निवास स्थाने आणि सन्माननीय आणि उत्पादन काम प्रवर्तित करण्याचे आणि बाधित व्यक्तींकडे आणि त्यांच्या यजमान समुदायांकडे त्यांच्या विकासाला अवरोध करण्याला प्रतिबंध करण्यासाठी मदत वाहती राहील याची खात्री करत असताना, स्थानिक समुदाय आणि स्थानिक सरकारे यांच्याबरोबर स्थानिक, टिकाऊ आणि प्रतिष्ठीत उपाय गुंतवण्यासाठी आणि विकसित करण्यासाठी संधि शोधण्यात काम करण्यासाठी वचनबद्ध आहोत.


Surabaya, Indonesia

30. सशस्त्र संघर्षाच्या दरम्यान ठाम राहणाऱ्या शहरी सेवांना आणखी पाठभल पुरवण्याच्या सरकारच्या आणि नागरी समुदायाच्या गरजा आम्ही मान्य करतो. आम्ही आंतरराष्ट्रीय मानवताविषयक कायद्याप्रती पूर्ण आदर राखण्यात ठाम राहण्याची सुद्धा पोच देतो.

31. आम्ही राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक गृह निर्माण धोरणांच्या प्रसारासाठी वचनबद्ध आहोत जी पर्याप्त जीवनमानाच्या हक्काचा एक घटक म्हणून सर्वांसाठी पुरेसे गृहनिर्माणच्या हक्काच्या प्रागतिक वास्तवात उतरण्याला मदत देतात, जो सर्व प्रकारच्या भेदभावांना आणि हिंसेला संबोधित करतो आणि राष्ट्रीय कायदा आणि जबरदस्तीने घरातून बाहेर काढण्याला प्रतिबंध करतो आणि प्रमाणनानुसार वसाहतीच्या सामाजिक निर्मितीला मदत देण्यासह, समुदायांच्या आणि संबंधित हितसंबंधियांच्या नियोजन आणि या धोरणांच्या अंमलबजावणीतील सहभागाला आणि गुंतवणूकीला शक्य करत असतानाच, बेघर, बळी पडण्याच्या परिस्थितीतील व्यक्ती, अल्प-उत्पन्न गट आणि अपंगत्व असलल्या व्यक्तींच्या गरजांवर लक्ष केंद्रीत करतो.

32. आम्ही स्वत: कि आम्ही एकात्मिक कीकृत आणि वय व लैंगिक आधारावर गृहनिर्माण धोरणांचा आणि सर्व क्षेत्रातील दृष्टीकोनांचा, खास करून रोजगार, शिक्षण, आरोग्य-संगोपन आणइ सामाजिक एकात्मता क्षेत्र, आणि सरकारच्या सर्व पातळयांवर-धोरणे आणि दृष्टीकोन जे पुरेशा, परवडणाऱ्या, उपलब्ध होऊ शकणाऱ्या, स्रोत-सक्षम, सुरक्षित, काटक, चांगली जोडलेली आणि चांगल्या ठिकाणची घरांची, नजीकतेच्या घटकाकडे आणि बाकीच्या शहरी वीणेसमवेत आणि परिसरातील कार्यशील भागाशी अवकाशीय नाते मजबूत करणाकडे विशेष लक्ष देऊन तरतूद करतात त्यांचे प्रवर्तन करण्यास आम्ही वचनबद्ध आहोत.

33. आम्ही समाजाच्या विविध उत्पन्न गटांसाठी, दुर्लक्षित समुदायांच्या, बेघर व्यक्तींच्या आणि असुरक्षित परिस्थितीतील लोकांच्या सामाजिकआर्थिक आणि सांस्कृतिक एकात्मिकतेचा विचार करून आणि अलगतेला प्रतिबंध करून सुरक्षित, किफायतशीर आणि पोहोच असलेल्या पुरेशा विविध गृहनिर्माण पर्यायांचा पुरवठा करण्यास स्वतः वचनबद्ध आहोत. बेघर लोकांचे जीवनमान, त्यांचा समाजातील सहभाग पूर्णत्वाने होणे सुविधाजनक होण्याच्या दृष्टीने आणि बेघरपणाला प्रतिबंध करणे आणि ते नष्ट करण्यासाठी, तसेच गुन्हेगारीकरणाचा सामना करण्यासाठी आणि नष्ट करण्यासाठी आम्ही सकारात्मक उपाय योजू.

34. आधारभूत भौतिक आणि सामाजिक सोयी, सर्वात किफायतशीर पद्धतीने भूमि, आवास आणि अक्षय ऊर्जा, सुरक्षित पिण्याचे पाणी आणि स्वच्छता, सुरक्षा, पोषण आणि पुरेसे आहार, कचरा निर्मूलन, शाश्वत चलनवलनीयता, आरोग्याची निगा आणि कुटुंब कल्याण, शिक्षा, संस्कृति आणि संवाद तंत्रासंबंधी माहिती, कोणताही भेदभाव न करता सर्वांसाठी उपलब्ध करण्यास मदत करण्यासाठी आम्ही स्वत: वचनबद्ध आहोत. त्याच्याही पुढे आम्ही स्वत: महिला, मुले आणि तरुण, वृद्ध व्यक्ति, दिव्यांग व्यक्ति, शरणार्थी, स्थानिक व्यक्ति आणि स्थानिक समुदाय यांच्या, उचित असल्याप्रमाणे, आणि काही संकटात सापडण्याच्या परिस्थितीत या सेवा सर्व अधिकार आणि गरजांच्या पूर्ततेसाठी प्रतिसाददेणाऱ्या असतील याची खात्री करण्यास वचनबद्ध आओहोत. या बाबतीत, आम्ही कायदेशीर, संस्थात्मक, सामाजिक आर्थिक आणि भौतिक अडथळे नष्ट करण्यास प्रोत्साहन देतो.

35. आम्ही स्वत: उपराष्ट्रीय आणि स्थानिक सरकारांसह सरकारच्या उचित पातळीवर, सर्वांसाठी सुरक्षेच्या वाढीव कालावधीसाठी, कालवधीच्या प्रकाराची विविधता मान्य करून, आणि हेतूसाठी योग्य आणि वय-लिंग-प्रतिसादी उपायांचे जमीन आणि मालमत्तेच्या हक्कांच्या मर्यादेच्या आत, महिलांसाठी त्यांच्या सक्षमीकरणाची किल्ली म्हणून जमीनीच्या कालावधीच्या सुरक्षेकडे, प्रभावी प्रशासकीय यंत्रणाच्यामार्फत सह, विशेष लक्ष देऊन प्रवर्तन करण्यास वचनबद्ध आहोत.

36. आम्ही स्वत: शहर आणि मानवी वसाहतीत अपंगत्व असणाऱ्या व्यक्तींना, शहराच्या भौतिक वातावरणापर्यंत, खास करून सार्वजनिक ठिकाणे, सार्वजनिक वाहतूक, घरे, शिक्षण आणि आरोग्य सुविधा, सार्वजनिक माहिती आणि संवाद (माहिती आणि संवाद तंत्रज्ञाने आणि प्रणालींसह) आणि शहरी आणि ग्रामीण, दोन्ही क्षेत्रात जनतेला खुल्या असलेल्या इतर सुविधा आणि सेवांपर्यंत इतरांच्या बरोबरीने पोचणे सुविधाजनक करणाऱ्या उचित उपायांचे प्रवर्तन करण्यास वचनबद्ध आहोत.

37. आम्ही स्वत: सुरक्षित, सर्वसमावेशक, पोहोच असलेली, पर्यावरण मित्र आणि गुणवत्तापूर्ण सार्वजनिक ठिकाणे, ज्यात गल्ली, साईडवॉक आणि सायकलिंग लेन्स, चौरस्ते, वॉटरफ्रन्ट क्षेत्र, बाग आणि उपवन, अशी सामाजिक परस्पर संवादासाठी आणि सर्वसमावेशकतेसाठी मानवी आरोग्य आणि स्वास्थ्य, आर्थिक देवाण घेवाण आणि विविध प्रकारचे लोक आणि संस्कृतियांच्या दरम्यानच्या सांस्कृतिक अभिव्यक्ति आणि संवादासाठी, आणि ज्यांची रचना आणि व्यवस्थापन मानवी विकासाची खात्री

करण्यासाठी आणि शातीपूर्ण, सर्वसमावेशक आणि सहभागी समाज उभा करण्यासाठी, तसेच सहजीवनाचे, जोडून घेण्याचे आणि सामाजिक समावेशतेच्या प्रवर्तनासाठी वचनबद्ध आहोत.

38. आम्ही स्वत: शहरांत आणि मानवी वसाहतींत, उचित असल्याप्रमाणे सांस्कृतिक संरचना आणि स्थळे, संग्रहालये, अंतर्देशीय संस्कृती आणि भाषा, तसेच पारंपरिक त्ज्ञान आणि कला सुरक्षित ठेवण्यासाठी आणि प्रवर्तन करण्यासाठी, त्यांच्या शहरी क्षेत्रातच्या पुनर्वसनातील आणि पुनरुज्जीवनातील भूमिकांवर प्रकाश टाकून आणि सामजिक सहभाग आणि नागरिकत्वाचे अधिकार मजबूत करून एकात्मिक शहरी आणि प्रांतीय धोरणे आणि राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक पातळीवर पुरेशा गुंतवणूकीमार्फत नैसर्गिक आणि स्पष्ट आणि अस्पष्ट असा दोन्ही सांस्कृतिक वारशाला बळ देणे याला वचनबद्ध आहोत.

39. आम्ही स्वत: शहरे आणि मानवी वसाहतींमध्ये, बऱ्याच वेळा महिला आणि मुली, मुले आणि करुण, आणि बळी पडण्याच्या परिस्थितीतील व्यक्ती खास करून बाधित होतात हे विचारात घेऊन जगणे, काम करणे आणि हिंसा आणि धमकीच्या भितीशिवाय शहरी जीवनात सहभागी होणे सर्वांनाशक्य होण्यासाठी सुरक्षित, आरोग्यपूर्ण, सर्वसमावेशक आणि सुरक्षित पर्यावरणाचे प्रवर्तन करण्यासाठी वचनबद्ध आहोत. आम्ही बालविवाह, अल्पवयीन विवाह आणि जबरदस्तीचा विवाह आणि स्त्रियांच्या योनीची हानी करणे यासह महिला आणि मुलींसमक्ष घातक प्रथांच्या निर्मूलनासाठी आणि नष्ट करण्यासाठी सुद्धा काम करू.

40. आम्ही स्वत: शहरे आणि मानवी वसाहतींमध्ये सामाजिक सुसंगतता मजबूत करणे, आंतरसांस्कृतिक संवाद आणि सामंजस्य, सहनशीलता, परस्पर आदर, लिंग समानता, कल्पकता, उद्यमशीलता, सर्वसमावेशकता, ओळक आणि सुरक्षा आणि सर्व लोकांची प्रतिष्ठा तसेच जगण्याययोग्य आणि चैतन्यशाली शहरी अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी विविधता आत्मसात करणयाला वचनबद्ध आहोत. आम्ही स्वतःला आमच्या स्थानिक संस्था वाढत्या बहुजातीय आणि बहुसांस्कृतिक समाजांच्या आओतच शातीपूर्ण सहजीवनाची प्रवर्तन करतील याची खात्री करण्यासाठी पावले उचलण्यालासुद्धा आम्ही वचनबद्ध आहोत.

41. आम्ही स्वत: शहरे आणि मानवी वसाहतींमध्ये, आपल्या राष्ट्रीय धोरणाच्या अनुषंगाने, जी निर्णय घेण्याच्या, नियोजनाच्या आणि पाठपुराव्याच्या न्याच्या प्रक्रियांमध्ये सर्वांसाठी अर्थपूर्ण सहभाग, तसेच वाढीव नागरी गुंतवणे आणि सह-तरतूद आणि सह-उत्पादन घेऊ देतात अशा, संस्थात्मक, राजकीय, कायदेशीर आणि आर्थिक यंत्रणांचे सर्वसमावेशक मंचांच्या विस्तृतीकरणासाठी प्रवर्तन करण्यास वचनबद्ध आहोत.

42. आम्ही, उचित असल्याप्रमाणे उपराष्ट्रीय आणि स्थानिक सरकारांना सर्व संबंधित हितसंबंधियांमध्ये परस्परसंवाद मजबूत करण्यासाठी, वय-आणि-लिंग-प्रतिसादी दृष्टीकोनांमार्फतसह संवादासाठी संधि देऊ करून, आणि पुरुष आणि महिला, मुले आणि तरुण, वयोवृद्ध व्यक्ती आणि अपंगत्व असलेल्या व्यक्ती, अंतर्देशीय लोक आणि स्थानिक समुदाय, निर्वासित, अंतर्गत दृष्ट्या विस्थापित व्यक्ती आणि त्यांच्या स्थलांतराच्या स्थितीचा विचार न करता स्थलांतरितांसह समाजाच्या सर्व विभागांकडील संभाव्य योगदानासह वर्ण, धर्म, वांशिकता किंवा सामजिक आर्थिक स्थिती यांच्या आधारे कोणताही भेदभाव न करता मदत देतो.

*शाश्वत आणि सर्वसमावेशक शहरी समृद्धि आणि संधि सर्वांसाठी.*

43. आम्ही हे मान्य करतो की सर्वसमावेशक आणि शाश्वत आर्थिक विकास ज्यात सर्वांसाठी संपूर्ण आणि उत्पादक रोजगार आणि सन्माननीय काम समाविष्ट आहे, शाश्वत शहरी आणि प्रांतीय विकासाचा महत्त्वाचा घटक आहे आणि की शहरे आणि मानवी वसाहती, लोकांना निरोगी, उत्पादक, भरभराटीचे आणि परिपूर्ण जीवन जगू देणारी समान संधींची ठिकाणे असावीत.

44. आम्ही हे मान्य करतो की शहरी स्वरुप, संरचना आणि बिल्डींग डिझाइन मापन आणि संचयाच्या काटकसरीच्या फायद्यांमार्फत आणि उर्जा कार्यक्षमता, पुनर्नवीकरणीय उर्जा, लवचिकता, उत्पादकता, पर्यावरणीय संरक्षण आणि शहरी अर्थव्यवस्थेत शाश्वत वृद्धीत वाढ करून खर्च आणि स्रोतांच्या कार्यक्षमतांचे सर्वात मोठे प्रेरक आहेत.

45. आम्ही स्वत: शाश्वत आणि सर्वसमावेशक औद्योगिक विकास आणि शाश्वत उपभोग आणि उत्पादन पद्धतींचे प्रवर्तन करणाऱ्या आणि व्यवसाय आणि कल्पकता, तसेच

उपदिवीकेसाठी वातावरण सक्षम करणाऱ्या चैतन्यशील, शाश्वत, आणि सर्वसमावेशक शहरी अर्थव्यवस्था विकसित करण्यास, अंतर्देशीय क्षमता, स्पर्धात्मक फायदे, सांस्कृतिक वारसा, आणि स्थानिक स्रोत, तसेच स्रोत कार्यक्षम आणि लवचिक संरचना उभारण्यास, वचनबद्ध आहोत.

46. आम्ही स्वत: आर्थिक विकासात, सामाजिक वसाहतीच्या निर्मितीसह, परवडणाऱ्या आणि शाश्वत गृहनिर्माण आणि गृहनिर्माण वित्तपुरवठ्याच्या भूमिकेचे आणि विभागाच्या इतर आर्थिक विभागांना उत्तेजन देणाऱ्या योगदानाचे, गृहनिर्माण भांडवल निर्मितीत, उत्पन्नात, रोजगार निर्मितीत आणि बचतीत वाढ करते आणि राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक पातळ्यांवर शाश्वत आणि सर्वसमावेशक आर्थिक संक्रमणाला चालना देण्यात योगदान देऊ शकते हे मान्य करून प्रवर्तन करण्यास, वचनबद्ध आहोत.

47. आम्ही स्वत: स्थानिक आर्थिक विकासाला मदत देण्यासाठी, सरकार आणि सर्व कार्यशील क्षेत्रांमध्ये आणि संबंधित हितसंबंधियांमध्ये एकात्मिकतेचे, सहकार्याचे, समन्वयाचे आणि संवादाचे जतन करण्यासाठी राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक संस्था मजबूत करण्यासाठी उचित पावले उचलण्यास वचनबद्ध आहोत.

48. आम्ही स्थानिक सरकारे, खाजगी क्षेत्र आणि नागरी समाज, महिला, तरुणांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या संघटना, तसेच अपंगत्व असणाऱ्या व्यक्तींचे प्रतिनिधीत्व करणारे, अंतर्देशीय लोक, व्यावसायिक, शैक्षणिक संस्था, ट्रेड युनियन्स, कामगारांच्या संघटना, स्थलांरितांच्या संघटना आणि सांस्कृतिक संघटना यांच्यासह सर्व संबंधित हितसंबंधियांच्या दरम्यान, शहरी आर्थिक विकासासाठी संधी निश्चीत करण्याच्या आणि विद्यमान आणि उद्भवणारी आव्हाने ओळखण्यासाठी आणि त्यांना संबोधित करण्यासाठी प्रभावी सहभाग आणि समन्वयाला प्रोत्साहन देतो.

49. आम्ही स्वत: शहरी आणि ग्रामीण कार्ये राष्ट्रीय आणि उपराष्ट्रीय अवकाशीय फ्रेमवर्कमध्ये आणि शहरांच्या आणि मानवी वसाहतींच्या प्रणालींमध्ये एकात्म करणाऱ्या आणि अशा प्रकारे शहरी-ग्रामीण क्षेत्रात समान प्रांतीय विकासाचे जतन करण्याची आणि सामाजिक, आर्थिक आणि प्रांतीय अंतरे भरून काढण्यासाठी शहरी आणि ग्रामीण पुरवठा आणि मागणीशी जोडणाऱ्या विश्वासार्ह पुरवठा आणि मूल्य साखशीची खात्री

करून, नैसर्गिक स्रोत आणि जमिनीच्या शाश्वत व्यवस्थापनाचे आणि वापराचे प्रवर्तन करणाऱ्या प्रांतीय प्रणालींना मदत देण्यास वचनबद्ध आहोत.

50. आम्ही स्वत: एकात्मिक शहरी आणि प्रांतीय दृष्टीकोनाद्वारे नियोजन साधनांनी, अंडरपीन केलेली शाश्वत वाहतूक आणि चलनवलन, आणि तंत्रज्ञान आणि संवाद नेटवर्कस् आणि संरचना, या क्षेत्रांच्या क्षमता वाढीव उत्पादकता, सामाजिक, आर्थिक आणि प्रांतीय सुसंगतता तसेच, सुरक्षा आणि पर्यावरणीय शाश्वतता जास्तीत जास्त करण्याच्या दृष्टीने शहरी-ग्रामीण परस्परसंवाद आणि जोडणीला प्रोत्साहन देण्यास वचनबद्ध आहोत. त्यामध्ये जिथे उचित असेल, शहरे आणि त्यांचा परिसर, अर्ध-शहरी आणि ग्रामीण क्षेत्रे यांच्या दरम्यान जोडणी, तसेच अधिक उत्तम जमीन-समुद्र जोडणीचा समावेश असावा.

51. आम्ही स्वत: शहरी अवकाशीय फ्रेमवर्क, ज्यात शहरी नियोजन आणि डिजाईन उपकरणे समाविष्ट आहेत, ज्यामुळे नैसर्गिक स्रोत आणि भूमिच्या शाश्वत व्यवस्थापनाला आधार मिळतो, उचित सुटसुटीतपणाआणि घनता, पोलीसेन्ट्रिझम आणि मिश्र उपयोग, उचित असल्याप्रमाणे शहरी विस्ताराची नियोजित किंवा उत्स्फूर्त धोरणे, त्या प्रमाणे मापनाच्या आणि संचयी अर्थव्यवस्थांना जोर देण्यासाठी आहार पद्धती नियोजन मजबूत करण्यासाठी आणि स्रोत कार्यक्षमता, शहरी लवचिकता आणि पर्यावरणीय शाश्वतता वाढवण्यासाठी वचनबद्ध आहोत.

52. आम्ही अवकाशीय विकास धोरणांना, जी उचित असल्याप्रमाणे, शहरी विस्ताराला मार्गदर्शन करणे, पोहोच असलेल्या आणि चांगल्या प्रकारे जोडलेल्या संरचना आणि सेवा, शाश्वत लोकसंख्या घनता, आणि शहरी वीणेत नवीन शेजार एकात्मिक करणे, ज्यामुळे शहरी फैलाव आणि अलगतेला प्रतिबंध होईल अशा शहरी नूतनीकरणाला प्राधान्य देणे विचारात घेतात, प्रोत्साहन देतो.

53. आम्ही स्वत: मालमत्ता मूल्यासह वाढीव सामाजिक आणि आर्थिक मूल्य निर्माण करण्याच्या त्यांच्या क्षमतांना शाश्वतपमे बळ देण्यासाठी आणि व्यवसाय आणि सार्वजनिक आणि खागजी गुंतवणूकी आणि सर्वांसाठी उपजिवीकेच्या संधी सुविधाजनक करण्यासाठी सुरक्षित, सर्वसमावेशक, पोहोच असलेल्या, हरित आणि दर्जेदार सार्वजनिक


Nairobi, Kenya - Eunika Sopotnicka ©

ठिकाणांना सामजिक आणि आर्थिक विकासाचे चालक म्हणून प्रवर्तित करण्यास वचनबद्ध आहोत.

54. आम्ही स्वत: शक्य असेल तिथे, नूतनीकरणीय आणि परवडणारी उर्जा आणि शाश्वत आणि कार्यक्षम वाहतूक संरचना आणि सेवा निर्माण करण्यास आणि वापरण्यास आणि त्याद्वारे जोडणीचे फायदे मिळवून आणि अकार्यक्षम चलनवलन, कोंडी, हवा प्रदूषण,शहरी उष्णता बेटांचे परिणाम आणि आवाजाच्या आर्थिक, पर्यावरणीय आणि सार्वजनिक आरोग्याचा खर्च कमी करण्यासाठी वचनबद्ध आहोत. आम्ही स्वतः सर्व लोकांच्या, खास करून गरीब आणि अनौपचारिक वसाहतींमध्ये राहणाऱ्या लोकांच्या उर्जा आणि वाहतूकीच्या गरजांकडे विशेष लक्ष देण्यासाठी सुद्धा वचनबद्ध आहोत. आम्ही याचीही नोंद घेतो की नूतनीकरणीय उर्जेच्या खर्चातील कपात शहरांना आणि मानवी वसाहतींना उर्जा पुरवठ्याचा खर्च कमी करण्यासाठी प्रभावी साधन देतो.

55. आम्ही स्वत: पुरेशा, सर्वसमावेशक आणि दर्जेदार सार्वजनिक सेवा, जागतिक आरोग्य संघटनेने विशद केलेल्या हवेचा दर्जाविषयक मार्गदर्शक तत्त्वांसह, एक स्वच्छ पर्यावरण आणि लैंगिक आणि नवजात बालकांचे आणि प्रसूती दरम्यान मृत्यू कमी करण्यासाठी पुनरुत्पादनविषयक आरोग्य-संगोपन सेवासह आरोग्य-संगोपन सेवांसारख्या सामजिक संरचना आणि सुविधा उपलब्ध होण्याचे प्रवर्तन करून निरोगी समाजाचे जतन करण्यास वचनबद्ध आहोत.

56. आम्ही स्वत: एका कल्पक आणि स्पर्धात्मक शहरी अर्थव्यवस्थेला योगदान देणाऱ्या उत्पान्न मिळवणाच्या संधी, त्रान, कौशल्ये आणि शैक्षणिक सुविधा कामगारांना उपलब्ध करून देऊन उचित असल्याप्रमाणे, आर्थिक उतपादकता वाढवण्यास वचनबद्ध आहोत. आम्ही स्वतः शहरे आणि मानवी वसाहतींमध्ये संपूर्ण आणि उत्पादक रोजगार आणि सन्माननीय कामाच्या प्रवर्तनामार्फत आर्थिक उत्पादकता वाढवण्यासाठी सुद्धा वचनबद्ध आहोत.

57. आम्ही स्वत: महिला, तरुण, अपंगत्व असलेल्या व्यक्ती, अंतर्देशीय लोक आणि स्थानिक समुदाय, निर्वासित, आणि अंतर्गत विस्थापित लोक आणि स्थालंतरित, खास करून सर्वात गरीब आणि बळी पडू शकण्याच्या स्थितीतील लोक, यांच्या गरजा आणि क्षमतांकडे विशेष लक्ष देऊन शहरे आणि मानवी वसाहतींमध्ये, उचित असल्याप्रमाणे,

सर्वांसाठी संपूर्ण आणि उत्पादक रोजगार, सन्माननीय काम आणि उपजिविकेच्या संधी प्रवर्तित करण्यासाठी आणि कायदेशीर उत्पन्न मिळवण्याच्या भेदभाव विरहित संधींचे प्रवर्तन करण्यासाठी वचनबद्ध आहोत.

58. आम्ही स्वत: पर्यावरणीय शाश्वतता आणि सर्वसमावेशक भरभराटीच्या तत्त्वांवर आधारित सक्षम करणाऱ्या, न्याय्य आणि जबाबदार व्यवसाय वातावरणाचे प्रवर्तन करण्यास, गुंतवणूकी, कल्पकता आणि उद्यमशीलतेचे प्रवर्तन करण्यास वचनबद्ध आहोत. आम्ही स्वतः मायक्रो, लघु आणि मध्यम आकाराच्या उद्यमांना आणि सहकारी संस्थांना संपूर्ण मूल्य सखळीत, खास करून सामाजिक आणि दृढ अर्थव्यवस्थांमधील, औपचारिक आणि अनौपचारिक अशा दोन्ही अर्थव्यवस्थांमध्ये काम करणाऱ्या उद्यमांना पाठबळ पुरवून स्थानिक व्यवसाय समुदायांना सामोरे जावे लागत असलेल्या आव्हानांना संबोधित करण्यासही वचटनबद्ध आहोत.

59. आम्ही स्वत:अनौपचारिक अर्थव्यवस्थेत काम करणाऱ्या गरीबांचे, खास करून महिलांचे, बिनपगारी, घरगुती आणि स्थलांतरित कामगारांसह, शहरी अर्थव्यवस्थेला योगदान राष्ट्रीय परिस्थितीचा विचार करून मान्य करण्याला वचनबद्ध आहोत. त्याची उपजिवीका, कामाची परिस्थिती आणि उत्पन्नाची सुरक्षा, कायदेशीर आणि सामाजिक संरक्षण, कौशल्य, मत्ता आणि इतर सहाय्यक सेवांपर्यंत पोहोच, आणि आवाज आणि प्रतिनिधीत्व वाढवण्यात यावे. कामगार आणि आर्थिक युनीटसचे औपचारिक अर्थव्यवस्थेकडे प्रागतिक संक्रमण, समतोल दृष्टीकोन, विद्यमान उपजिवीकेच्या संवर्धनाचे आणि सुधारणेचे प्रवर्तन करताना, प्रोत्साहन आणि अनुपालनाचे उपाय एकत्रित करून, विकसित केले जाईल. आम्ही विशिष्ट राष्ट्रीय परिस्थिती, कायदे, धोरणे आणि औपचारिक अर्थव्यवस्थेकडे संक्रमणासाठी प्राधान्ये विचारात घेऊ.

60. आम्ही स्वत: दर्जाची निर्मिती, सन्माननीय आणि उत्पादक नोकऱ्यांसह, इतर बाबींबरोबरच सांस्कृतिक आणि सर्जनशील उद्योग. शाश्वत पर्यटन, ललित कला आणि वारसा जपणूकीची कार्ये यांच्या मार्पथ सह विविधता, तंत्रशास्त्रीय श्रेणीवर्धन्न, संशोधन आणि कल्पकते च्या प्रवर्तनाद्वारे शहरी अर्थव्यवस्था प्रागतिकपणे उच्च-मूल्य-वर्धित विभागांमार्फत उच्चतम उत्पादकतेकडे संक्रमित करणे टिकवण्याला आणि पाठबळ पुरवण्याला वचनबद्ध आहोत.

61. आम्ही स्वत: लागू असेल तिथे शहरी लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाचा फायदा वापरण्याला, आणि वाढीव उत्पादकता आणि शहरे आणि मानवी वसाहतींमध्ये वाटून घेतलेली भरभराट साध्य करण्यासाठी तरुणांना शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या उपलब्धतेचे प्रवर्तन करण्यासाठी वचनबद्ध आहोत. मुली आणि मुले, तरुण महिला आणि तरुण पुरुष उज्ज्वल भवितव्य निर्माण करण्यातील परिव्रतनाचे एजन्ट आहेत आणि जेव्हा सक्षम केले जाईल तेव्हा त्यांच्यापाशी स्वतःच्या वतीने आणि त्यंच्या समुदायांच्या वतीने बाजी मांडण्याची महत्त्वाची क्षमता असेल. त्यांच्या अर्थपूर्ण सहभागासाठी अधिक आणि उत्तम संधींची खात्री करणे नवीन शहरी कार्यसूचीच्या अंमलबजावणीसाठी अतयावश्यक असेल

62. आम्ही स्वत: वयोवृद्ध होत जाणाऱ्या लोकसंख्येच्या सामाजिक, आर्थिक आणि अवकाशीय प्रभावांना, जिथे लागू असेल तिथे संबोधित करण्याला आणि वय वाढण्याच्या घटकाचा, शहरी लोकसंख्येच्या जीवनाचा दर्जा सुधारत असताना, नवीन सन्माननीय नोकऱ्या, आणि टिकाऊ, सर्वसमावेशक आणि शाश्वत आर्थिक वृद्धीसाठी एक संधी म्हणून उपयोग करण्यासाठी वचनबद्ध आहोत.

*पर्यावरणाच्या दृष्टीने शाश्वत शाश्वत आणि लवचिक शहरी विकास*

63. आम्ही मान्य करतो की कि शहर आणि मानवी वसाहतींना अशाश्वत उपभोग आणि उत्पादन पद्धती, जैवविविधता नष्ट होणे, इकोसिस्टीमवर दबाव, नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्ती आणि हवामान बदल आणि त्याच्याशी संबंधित जोखमी यापासून अनपेक्षित धोके असतात ज्यामुळे सर्व स्वरुपातील आणि आकारामानातील दारिद्र्याच्या निर्मूलनाचे आणि शाश्वत विकास साध्य करण्याचे सर्व प्रयास व्यर्थ ठरतात. शहरांचे लोकसंख्याविषयक कल आणि त्यांची जागतिक अर्थव्यवस्थेतील, हवामान बदलाशी संबंधित सौम्यीकरणाच्या आणि जुळवून घेण्याच्या प्रयासातील, आणि स्रोत आणि इकोसिस्टीम्सवरीमस्च्या वापरातील, ज्या पद्धतीने त्यांचे नियोजन, विक्क्षपुरवठा, विकास, उभारणी, शासन आणि व्यवस्थापन केले जाते यातील मध्यवर्ती भूमिकेचा शहरी सीमांच्या पलिकडे शाश्वततेवर आणि लवचिकतेवर थेट परिणाम असतो.

64. आम्ही हे सुद्धा मान्य करतो कीजगभरातील, विशेषतः विकसनशील देशांतील शहरी केन्द्रांचे बऱ्याचदा विशिष गुण असतात ज्या त्यांना आणि त्यांच्या रहिवाशांना, हवामान बदल आणि भूकंप, तीव्र हवमानाच्या घटना, पूर येणे, खचणे, धुळीची आणि


Abu Dhabi, United Arab Emirates

वाळूच्या वादळांसह वादळे, उष्मकेच्या लाटा, पाण्याचा तुटवडा, दुष्काळ, जल आणि हवा प्रदूषण, व्हेक्टरजन्य रोग आणि समुद्राची पातळी वाढणे, ज्यांचा खास करून किनारी क्षेत्रांवर परिणाम होतो, नदीच्या मुखाजवळील प्रदेश आणि इतरांबरोबरच छोट्या बेटांची विकसनशील राज्ये यांच्यासह नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींच्या विपरित परिणामांना बळी पडणारे बनविते.

65. आम्ही स्वत: शहरे आणि मानवी वसाहतींमध्ये, शहरी इकोसिस्टीमचे आणि पर्यावरणीय सेवांचे संरक्षण आणि सुधारणा करणाऱ्या, हरित गृह वायू उत्सर्जन आणि हवा प्रदूषण कमी करणाऱ्या आणि पर्यावरणीय दृष्ट्या भक्कम शहरी आणि प्रांतीय नियोजन, संरचना आणि पायाभूत सेवांमार्फत शाश्वत आर्थिक विकासाचे जतन करताना आणि सर्व व्यक्तींच्या स्वास्थ्याचे आणि जीवनाचा दर्जाचे संरक्षण करताना, आपत्ती जोखीम कमी करणाऱ्या धोरणांचा विकासाला पाठबळ देऊन आणि जोखमीच्या पातळ्यांसाठी प्रमाणनासहित, नैसर्गिक आणि मानवनिर्मित धोक्यांनी निर्माण झालेल्या आपत्तीच्या जोखमींचे नियतकालीन निर्धारण करून नैसर्गिक स्रोतांचे शाश्वत व्यवस्थापन करण्यास वचनबद्ध आहोत.

66. आम्ही स्वत: स्मार्ट सिटी दृष्टीकोन स्वीकारण्यासाठी वचनबद्ध आहोत जो डिजीटलायझेशनपासूनच्या संधी, स्वच्छ उर्जा आणि तंत्रज्ञा, तसेच कल्पक वाहतूक तंत्रज्ञानांचा वापर करतो, अशा प्रकारे रहिवाशांना अधिक पर्यावरण मित्र पर्याय निवडण्याचे आणि शाश्वत आर्थिक वृद्धीला बळ देण्याचे विकल्प देतो आणि शहरांना त्यांच्या सेवा पुरवणे सुधारण्यास सक्षम करतो.

67. आम्ही स्वत: शहरांचा आपत्ती आणि पूर, दुष्काळाच्या जोखमी आणि उष्णतेच्या लाटांसह हवामान बदलाप्रती लवचिकपणा सुधारण्यासाठी, अन्न सुरक्षा आणि पोषण, शारिरीक आणि मानसिक आरोग्य आणि घरगुती आणि परिसरातील हवेचा दर्जा सुधारण्यासाठी, आवाज कमी करण्यासाठी आणि आकर्षक आणि जगण्यालायक शहरे, मनवी वसाहती आणि शहरी लॅंडस्केपस्चे प्रवर्तन करण्यासाठी आणि विशिष्ट प्रजातींच्या संवर्धनाला प्राधान्य देण्यासाठी, खुल्या, बहुआयामी, सुरक्षित,सर्वसमावेशक, उपलब्ध होऊ शकणाऱ्या, हरित आणि दर्जेदार सार्वजनिक जागांचे चांगले जोडलेल्या आणि चांगले वितरित केलेल्या जाळयाच्या निर्मितीच्या आणि देखभालीच्या प्रवर्तनासाठी वचनबद्ध आहोत.

68. आम्ही स्वत: शहरी डेल्टाज्, किनारी क्षेत्रे आणि इतर पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांचा, त्यांचे वाहतूक, अन्न सुरक्षा, आर्थिक भरभराट, इकोसिस्टीम सेवा आणि लवचिकता यांचे इकोसिस्टीमचे पुरवठादार म्हणून महत्त्व प्रकाशित करून विशेष विचार करण्यासाठी वचनबद्ध आहोत. आम्ही उचित उपाय शाश्वत शहरी आणि प्रांतीय नियोजन आणि निकासात एकात्मिक करण्यासाठी वचनबद्ध आहोत.

69. आम्ही स्वत:शहरांना आणि मानवी वसाहतींना आधार देणाऱ्या किनारी क्षेत्रांसह जमिनीच्या नैसर्गहिक आणि सामाजिक कार्याचे संवर्धन आणि प्रवर्तन करण्यास, शाश्वत उपभोग आणि उत्पादन पद्धतींची खात्री करण्यासाठी इकोसिस्टीम आधारित उपायांची जोपसना करण्यासाठी, जेणेकरून इकोसिस्टीमची पुनरुत्पादन क्षमता ओलांडली जाणार नाही, वचनबद्ध आहोत. आम्ही स्वतः शहरी पसाऱ्याला प्रतिबंध करण्यासाठी आणि मर्यादित राखण्यासाठी, तसेच जमिनीच्या वापरातील अनावश्यक बदलाला आणि उत्पादक जमीन आणि नाजूक आणि महत्त्वाच्या इकोसिस्टीम गमावण्याला प्रतिबंध करण्यासाठी जमिनीच्या शाश्वत वापराचे प्रवर्तन करण्यासही वचनबद्ध आहोत.

70. आम्ही स्वत: उर्जा, पाणी, अन्न आणि सामग्रीच्या दूरस्थ स्रोतांवरील खूप अवलंबित्व, सेवा पुरवठा व्यत्ययांसह, शाश्वततेची आव्हाने उभी करू शकतात आणि की स्थानिक तरतूद रहिवाशांना स्रोतांची उपलब्धता सुविधाजनक करू शकतात हे ओळखून मालआणि पायाभूत सेवांच्या स्थानिक तरतूदींना मदत देण्यास आणि स्रोतांच्या जवळीकीला बळ देण्यास वचनबद्ध आहोत.

71. आम्ही स्वत:हवा, अल्पजीवी हवामान प्रदूषके, हरित गृह वायू आणि आवाजासह सर्व कचरा, घातक रसायनांच्या पर्यावरणीय दृष्ट्या भक्कम व्यवस्तापनाकडे आणि कमीत कमी करण्याकडे विशेष लक्ष देऊन आणि शहरी-ग्रामीण दुवे, कार्यशील पुरवठा आणि मूल्य साखळयांचा पर्यवरणावरील परिणाम विचारात घेणाऱ्या आणि इकोसिस्टीमच्या संवर्धनासाठी, पुनरुत्पादनासाठी, पुनर्स्थापनेसाठी आणि नवीन आणि उबरणाऱ्या आव्हानांसमोर लवचिकता सुविधाजनक करत एका मंडलीय अर्थव्यवस्थेकडे संक्रमित होण्यासाठी परिश्रम करते अशा एका पद्धतीने जमीन, पाणी (महासागर, समुद्र आणि ताजे पाणी), उर्जा, सामग्री, जंगले आणि अन्न यांचे शाश्वत व्यवस्थापन मजबूत करण्यास वचनबद्ध आहोत.

72. आम्ही स्वत: स्थानिक आणि प्रांतीय स्तरांवर शहरी-ग्रामीण सातत्याचा विचार करून आणि संबंधित हितसंबंधी आणि समुदायांचा समावेश करून एकात्मक जल स्त्रोतांचे नियोजन आणि व्यवस्थापन अंगीकृत करणाऱ्या दीर्घकालीन शहरी आणि प्रांतीय नियोजन प्रक्रिया आणि अवकाशीय विकास पद्धतीना वचनबद्ध आहोत.

73. आम्ही स्वत: घाण पाणी कमी करून आणि त्यावर संस्कार करून, पाणी वाया जाणे कमीत कमीकरून, पाण्याच्या पुनर्वापराचे प्रवर्तन करून आणि जलसाठे वाढवून, जलचक्राचा विचार करून राखून ठेवणे आणि पुनर्भरण करून शहरी, निमशहरी आणि ग्रामीण क्षेत्रांच्या आत जल स्त्रोतांच्या पुनर्वसनाद्वारे, संवर्धन आणि पाण्याच्या शाश्वत वापराचे प्रनर्तन करण्यास आम्ही वचनबद्ध आहोत.

74. आम्ही स्वत: पर्यावरणीय दृष्ट्या भक्कम कचरा व्यवस्थापनाचे प्रवर्तन करण्यास आणि कचरा कम करून, पुनर्वापर करून आणि रिसायकलिंग करून, जमीन भराव कमीत कमी करून, आणि जेवहा कचरा रिसायकल करता येणार नाही किंवा हा पर्याय पर्यावरणीय दृष्ट्या उत्तम फलनिष्पत्ती देत असेल तेव्हा कचऱ्याचे उर्जेत रुपांतर करून, कचरा निर्मिती मोठ्या प्रमाणावर कमी करण्यास वचनबद्ध आहोत. आम्ही पुढे आमखी स्वतः किनारी क्षेत्रात सुधारित कचरा आणि घाणपाणी व्यावस्थापनामार्फत जल प्रदूषण कमी करण्यास वचनबद्ध आहोत.

75. आम्ही स्वत: शाश्वत, नूतनीकरणीय आणि परवडणारी उर्जा आणि उर्जा सक्षम इमारती आणि बांधकाम पद्धतीविकसित करण्यासाठी आणि हरितगृह वायू आणि ब्लॅक कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी, शाश्वत उपभोग आणि उत्पादन पद्धतींची खात्री करण्यासाठी, नवीन सन्माननीय नोकऱ्या निर्माण करण्यात मदत करण्यासाठी, सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासाठी आणि उर्जा पुरवठ्याचा खर्च कमी करण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या उर्जा संवर्धनाचे आणि कार्यक्षमतेचे प्रवर्तन करण्यासाठी, उचित असल्याप्रमाणे, राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक सरकारांना प्रोत्साहन देण्यास वचनबद्ध आहोत.

76. आम्ही स्वत: नैसर्गिक स्त्रोतांचा शाश्वत वापर करण्यास आणि काँक्रीट, धातू, लाकूड, खनिजे आणि जमीन यासारख्या कच्च्या आणि बांधकाम साहित्याच्यास्त्रोत कार्यक्षमतेवर प्रकाश टाकण्यास वचनबद्ध आहोत. आम्ही स्वतः सुरक्षित सामग्री पुनर्प्राप्ती आणि रिसायकलिंग सुविधा स्तापित करण्यास, शाश्वत आणि लवतिक इमारतींच्या विकासाचे

प्रवर्तन करण्यास आणि स्थानिक, बिनविषारी आणि रिसायकल केलेले साहित्य आणि लीड-ॲडिटिव मुक्त रंग आणि विलेपने वापरण्याला प्राधान्य देण्यास वचनबद्ध आहोत.

77. आम्ही स्वत: अनुसरून दर्जेदार संरचना आणि अवकाशीय नियोजनाच्या विकासामार्फत आणि एकात्मिक, वय-लिंग-प्रतिसादी धोरणे आणि योजना आणि सेंडाई फ्रेमवर्क फॉर डिझास्टर मॅनेजमेंट रिस्क रिडक्शन 2015-2030 ला इकोसिस्टीम-आधारित दृष्टीकोनांचा स्वीकार आणि अंमलबजावणी करून आणि बळी पडण्याची शक्यता आणि जोखीम कमी करण्यासाठी, खास करून झोपडपट्ट्यांसह औपचारिक आणि अनौपचारिक वसाहतींच्या जोखीम-प्रवण क्षेत्रांमध्ये, आणि कुटुंबे, समुदाय, संस्था आणि सेवांना धक्के किंवा सुप्त ताणांसह धोक्यांच्या परिणामांना प्रतिसाद देण्यासाठी, स्वीकारण्यासाठी आणि त्यातून सावरण्यासाठी तयार होणे शक्य करण्याकरिता सर्व स्तरांवर समग्र आणि डेटा-इन्फॉर्मड जोखीम कपात आणि व्यवस्थापन मुख्य प्रवाहात आणून शहरांची आणि मानवी वसाहतींची लवचिकता मजबूत करण्यासाठी वचनबद्ध आहोत. आम्ही लवचिक आणि स्रोत सक्षम संरचनेचया विकासाचे प्रवर्तन करू आणि आपत्तींच्या जोखमी आणि परिणाम कमी करू, ज्यात झोपडपट्ट्या आणइ अनौपचारिक वसाहतींचे पुनर्वसन आणि श्रेणीवर्धन समाविष्ट असेल. आम्ही झोपडपट्ट्या आणि अनौपचारिक वसाहतींसह, त्यांना आपत्तींप्रती लवचिक बनवण्यासाठी, स्थानिक प्राधीकरणे आणि हितसंबंधींच्या स्मन्वयाने, सर्व जोखमीच्या घरांचे मजबूतीकरण आणि रिट्रोफिटिंगसाठी उपायांचे सुद्धा प्रवर्तन करू.

78. आम्ही स्वत: प्रतिसादात्मकपासून अधिक स्वयंप्रेरित सक्रियता जोखीम-आधारित, सर्व-धोके आणि संपूर्ण समाज दृष्टीकोनाकडे, जसे की जोखमींविषयी जनतेतील जागरुकता वाढवणे आणि जोखमीला प्रतिबंध करणयासाठी एक्स अँटे गुंतवणूकींचे प्रवर्तन आणि लवचिकता उभारणे, त्याच वेळी नैसर्गिक आणि मावनिर्मित आपत्ती आणि संघर्षांमुळे बाधित रहिवाशांच्या तातडीच्या गरजांना संबोधित करण्यासाठी वेळेवर आणि प्रभावी स्थानिक प्रतिसादाची खात्री करत पुढे जाण्याला पाठबळ देण्यास वचनबद्ध आहोत.त्यात "बिल्ड बॅक बेटर" तत्तवांचे आपत्ती-पश्चात सावरण्याच्या प्रक्रियेत लवचिकता -उभारणी, पर्यावरणीय आणि अवकाशीय उपाय आणि पूर्वीच्या आपत्तींपासूनचे धडे एकात्मिक करण्यासाठी एकात्मिक करणे, तसेच भावी नियोजनात नवीन जोखमीबाबत जागरुकता ससमाविष्ट असावी.



Jakarta, Indonesia - AsiaTravel ©

79. आम्ही स्वत: हवामान बदलाशी जुळवून घेणे आणि सौम्यीकरणासह, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक हवामानविषयक कारवाईचे प्रवर्तन करण्यास, आणि शहरे आणि मानवी

वसाहतींच्या, त्यांच्या रहिवाशांच्या आणि सर्व स्थानिक हितसंबंधीच्या महत्त्वाचे अंमलबजावणीकार म्हणून प्रयासांना मदत देणयास वचनबद्ध आहोत. आम्ही पुढे लवचिकता उभारण्यास आणि सर्व संबंधित क्षेत्रांकडील हरित वायू उत्सर्जन कमी करण्यासही वचनबद्ध आहोत. असे उपाय हवामान बदलावरील युनायटेड नेशन्स फ्रेमवर्क कन्व्हेंशन अधीन स्वीकारलेल्या पॅरीस कराराच्या लक्ष्यांबरोबर सातत्य राखणारे असावेत, ज्यात समाविष्ट आहे जागतिक सरासरी तापमानातील वाढ औद्योगिक-पूर्व पातळीच्यावर 2 अंश सेल्सियस खाली राखणे आणि तापमान वाढ मर्यादा औद्योगिक-पूर्व पातळयांच्या वर 1.4 अंश सेल्सियसच्या मर्यादेत ठेवण्यासाठी प्रयासांचा पाठपुरावा करणे.

80. आम्ही स्वत: मध्यम ते दीर्घकालीन अनुकूलन नियोजन प्रक्रियेला, तसेच हवामान भेद्यता आणि प्रभाव यांना मदत देण्यासाठी, इको-सस्टम आधारित अनुकूलनाच्या उपयोगामार्फत सह, अनुकूल योजना, धोरणे, कार्यक्रम आणि शहरी रहिवाशांची लवचिकता उभारणाऱ्या कृती यांची माहिती देण्यास वचनबद्ध आहोत

## प्रभावी अंमलबजावणी

81. आम्ही मान्य करतो की नवीन शहरी कार्यसूचीत ठरवून दिल्याप्रमाणे संक्रमणीय वचनबद्धता वास्तवात येण्यासाठी शहरी अवकाशीय विकासाचे सहभागपूर्ण नियोजन आणि व्यवस्थापन आणि अंमलबजावणीच्या प्रभावी मार्गानी, ज्याला आंतरराष्ट्रीय सहकार्याची तसेच क्षमता विकासातील प्रयासांची, ज्यात समाविष्ट आहे सरकारांमध्ये सर्व स्तरांवर उत्तम पद्धती, धोरणे आणि कार्यक्रमांची देवाणघेवाण, जोड असलेल्या राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक पातळीवरील सक्षम करणाऱ्या धोरण चौकटीची आवश्यकता असेल.

82. आम्ही आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक संघटना आणिसंस्थाना ज्यात समाविष्ट आहेत युनाईटेड नेशन्स सिस्टम आणि बहुपक्षीय पर्यावरणविषयक करार, विकास भागीदार,

आंतरराष्ट्रीय आणि बहुपक्षीय वित्तीय संस्था, प्रादेशिक विकास बँका, खाजगी क्षेत्र आणि इतर हितसंबंधी, यांना नवीन शहरी कार्यसूचीची अंमलबजावणी मुख्य प्रवाहात आणून, शाश्वत शहरीकरणाला एकात्मिक दृष्टीकोन लागू करण्यासाठी त्यांच्या शहरी आणि ग्रामीण धोरणांचा आणि कार्यक्रमांचा समन्वय वाढवण्यासाठी आमंत्रित करतो.

83. या संबंधात, आम्ही शाश्वत विकासासाठी 2030 कार्यसूचीच्या परिच्छेद 88 मध्ये भर दगिल्याप्रमामे, प्रणाली-निहाय धोरणात्मक नियोजन, अंमलबजावणी आणि अहवालीकरणाच्या चौकटीच्या आत, शाश्वत शहरी विकासाच्या क्षेत्रात संयुक्त राष्ट्रांच्या प्रणाली-निहाय समन्वयात आणि एकरुपतेत सुधारणा करण्यावर भर देतो.

84. आम्ही राज्यांना आग्रहाची विनंती करतो की कोणत्याही एकतर्फी आर्थिक, वित्तीय किंवा व्यापारविषयक उपायांची अंमलबजावणी करण्यापासून दूर रहावे जर ते आंतरराष्ट्रीय कायदे आणि संयुक्त राष्ट्रांच्या सनदेनुसार नसतील जे आर्थिक आणि सामाजिक विकास पूर्णपणे साध्य करण्याच्या, खास करून विकसनशील देशांत आड येते.

*शहरी प्रशासक संरचना उभारणे: एक मदतीची चौकट स्थापन करणे*

85. आम्ही युनायटेड नेशन्स हह्यूमन सेटलमेंटस् प्रोग्राम (यूएन-हॅबिटाट)च्या शासक परिषदेने आपले ठराव 20 एप्रिल 2015 चा 21/3[15] आणि 3 एप्रिल 2009 चा 22/8[16] मध्ये स्वीकारलेल्या विकेन्द्रीकरण आणि स्थानिक प्राधीकरणांना मजबूत करण्यावरील आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वांमध्ये असलेली तत्त्वे आणि धोरणे आणि सर्वांसाठी आधारभूत सेवांची उपलब्धी यावरील आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वांची मान्य करतो.

86. आम्ही नवीन शहरी कार्यसूचीच्या, उचित असल्याप्रमाणे, सर्वसमावेशक, अंमलबाजवणी योग्य आणि सहभागी धोरणांत, राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक संस्थात्मक आणि नियामक चौकटींद्वारे, ती पारदर्शक आणि उत्तरदायी वित्त यंत्रणेशी पुरेशी संलग्न आहेत याची खात्री करून, उचितअसल्याप्रमाणे एकात्मिक धोरणे आणि

---

[15] महासभेच्या अधिकृत नोंदी, बासष्टावे अधिवेशन, पुरवणी क्र. 8 (ए/62/8)अनुच्छेद 1 पहा.

[16] इबीड, चौसष्टावे अधिवेशन, पुरवणी क्र. 8, (ए/64/8) अनुच्छेद 1.

योजना, उचित असल्याप्रमाणे पाठबळ असलेल्यांचा एक भाग म्हणून मुख्य प्रवाहातील शाश्वत शहरी आणि प्रादेशिक विकासात प्रभावी अंमलबजावणीचे सूत्रसंचालन करू.

87. आम्ही राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक सरकारांमध्ये अधिक कणखर समन्वय आणि सहकार्य, यांची बहुस्तरीय संमंत्रणा यंत्रणेमार्फत आणि सरकारच्या प्रत्येक स्तरावर संबंधित सक्षमता, साधने आणि स्रोत यांची स्पष्टपणे निश्चीती करून, जोपासना करू.

88. आम्ही शहरीकरणाप्रती एकात्मिक दृष्टीकोन मजबूत करणे आणि त्यांचा विचार करणारी एकात्मिक शहरी आणि प्रादेशिक धोरणे अंमलात आणण्याच्या दृष्टीने राजकीय प्रशासनच्या वेगवेगळया स्तरांवर आणि पट्टीत इतर बाबींबरोबरच, ग्रामीण विकास, जमिनीचा वापर, अन्न सुरक्षा आणि पोषण, नैसर्गिक स्रोतांचे व्यवस्थापन, सार्वजनिक सेवांची तरतूद, पाणी आणि स्वच्छता, आरोग्य, पर्यावरण उर्जा, गृहनिर्माण आणि चलनवलन धोरणे याबाबतीत क्षेत्रीय धोरणांची लक्ष्ये आणि उपाय यांच्या दरम्यान एकरुपतेची खात्री करू.

89. आम्ही उचित असल्याप्रमाणे, सरकारांची राष्ट्रीय शहरी धोरणे प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठीची क्षमता वाढवण्यासाठी, आणि अनुदानत्वाच्या तत्त्वावर आधारित उचित आर्थिक, राजकीय आणि प्रशासकीय विकेंद्रीकरणाची खात्री करून, त्यांना धोरण कर्ते आणि निर्ण घेणारे म्हणून सक्षम करण्यासाठी समानता आणि विना-भेदभावाच्या तत्त्वांवर आधारित, कायदेशीर आणि धोरण चौकट स्थापन करण्यासाठी उपाय योजू.

90. आम्ही संपूर्ण प्रशासकीय सीमांमध्ये आणि कार्यशील प्रदेशांच्या आधारे, उपराष्ट्रीय आणि स्थानिक सरकारांना निर्णय घेण्यात आणि काम करण्यात त्यांना महत्त्वाच्या शहरी, महानगरी आणि प्रादेशिकचिंताच्या व्यवस्थापनासाठी आवश्यकते अधिकार आणि स्रोत पुरवून त्यांच्या गुंतले जाण्याची खात्री करून देशांच्या राष्ट्रीय कायद्यांना अनुसरून उप राष्ट्रीय आणि स्थानिक सरकारांच्या क्षमता मजबूत करण्यात मदत देऊ. आम्ही महानगरी शासनाचे प्रवर्तन करू जे, उचित असल्याप्रमाणे, शाश्वत ऋण व्यवस्तापनासह, सर्वसमावेशक आणि कायदेशीर चौकटी आणि विश्वासार्ह वित्तपुरवठा


Barcelona, Spain

यंत्रणा समाविष्ट करते. आम्ही सर्व क्षेत्रांत आणि स्थानिक सरकारांमधीलसह निर्णय घेण्याच्या सर्व पातळयांवर नेतृत्वात महिलांच्या संपूर्ण आणि परिणामकारक सहभागाच्या प्रवर्तनासाठी उपाय योजू.

91. आम्ही स्थानिक सरकारांना स्थानिक गरजांना अनुकूल होण्याच्या दृष्टीने, उचित असल्याप्रमाणे, राष्ट्रीय कायदे आणि धोरणांच्या अनुषंगाने त्यांची स्वतःची प्रशासकीय आणि व्यवस्थापन रचना निश्चीत करण्यात मदत देऊ. आम्ही उचित नियामक चौकटींना प्रोत्साहन देऊ आणि सार्वजनिक हिताचे संवर्धन केले जाईल आणि संक्षिप्त लक्ष्ये, जबाबदाऱ्या आणि उत्तदायित्व यंत्रणा स्पष्टपणे निश्चीत केल्या जातील याची खात्री करून, पायाभूत सेवा आणि संरचना विकसित आणि व्यवस्थापित करण्यासाठी समुदाय, नागरी समाज आणि खाजगी क्षेत्राबरोबर भागीदीरी करण्यात स्थानिक सरकारांना मदत देऊ.

92. आम्ही संकल्पना मांडण्यापासून ते डिजाइन, बजेटिंग, अंमलबजावणी, मूल्यांकन आणि पुनरावलोकन या सरकारच्या सर्व पातळया आणि नागरी समाज यांच्या दरम्यान थेट भागीदारीच्या स्वरुपात मूळ धरलेल्या, विस्तृत-आधारावरील आणि उत्तम-स्रोतीकृत कायमची यंत्रणा आणि सहकार्य

आणि समंत्रणेसाठी सर्वांसाठी खुल्या व्यासपीठांच्या मार्फत सह माहिती आणि संवाद तंत्रज्ञाने आणि उपलब्ध डेटा उपाय वापरून, शहरी आणि प्रादेशिक धोरणे आणि नियोजन प्रक्रियांच्या सर्व टप्प्यांवर सहभागी वय-आणि- लिंग प्रतिसादी दृष्टीकोनांचे प्रवर्तन करू.

*शहरी अवकाशीय विकासाचे नियोजन आणि व्यवस्थापन*

93. यूएनृ-हॅबिटाटच्या शासक परिषदेने त्यांच्या 23 एप्रिल 2015 च्या ठराव 25/6[17] मध्ये मंजूर केलेल्या शहरी आणि प्रादेशिक नियोजनावरील आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वांमध्ये समाविष्ट असलेली शहरी आणि प्रादेशिक नियोजनासाठी तत्त्वे आणि धोरणे आम्ही मान्य करतो

[17] आयबिड, सत्रावे अधिवेशन, सहायक क्रमांक 8 (A/70/8), अनुच्छेद

94. आम्ही स्पर्धात्मक अर्थव्यवस्था, जीवनाचा उच्च दर्जा आणि शाश्वत पर्यावरणाची दीर्घकालीन वांछित निष्पत्ती असलेल्या अल्पकालीन गरजांचा समतोल राखण्याचे उद्दिष्ट असलेल्या एकात्मिक नियोजनाची आम्ही अंमलबजावणी करू. काही काळानंतर, बदलत्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या दृष्टीने आम्ही आओमच्या योजनांमध्ये लवचिकता ठेवण्याचा अथक प्रयत्न सुद्धा करू. तंत्रज्ञानातील कल्पकतेला बळ देण्याचा आणि जगण्यासाठी अधिक चांगले वातावरण निर्माण करण्याचा प्रयास करताना, आम्ही या योजना अंमलात आणि त्यांचे पद्धतशीरपणे मूल्यांकन करू.

95. आम्ही शहरे आणि मानवी वसाहतींच्या वेगवेगळया स्तरांमध्ये सहकार्य आणि परस्पर आधाराला प्रोत्साहन देऊन, अन्न सुरक्षा आणि पोषण प्रणाली वाढवण्यात छोटी आणि मध्यम शहरे आणि नगरे यांची भूमिका मजबूत करून, शाश्वत, परवडणारे पर्याप्त, लवचिक आणि सुरक्षित घर, संरचना आणि सेवा देऊन, शहरी-ग्रामीण सातत्यामध्ये प्रभावी व्यापारी दुव्यांची सुविधा पुरवून आणि लघु-स्तरावरील सेतकरी आणि कोळी स्थानिक, राष्ट्रीय, प्रादेशिक आणि जागतिक मूल्य साखळी आणि मार्केटशी जोडले जातील याची खात्री करून एकात्मिक, बहुकेंद्रीय आणि समतोल प्रादेशिक विकास धोरणांच्या आणि योजनांच्या अंमलबजावणीला मदत देऊ. आम्ही शहरी शेती आणि फार्मिग, तसेच जबाबदार, स्थानिक आणि शाश्वत उपभोग आणि उत्पादन, आणि सामाजिक परस्परक्रिया यांना सुद्धा, शाश्वतता आणि अन्न सुरक्षा यांना योगदान देण्यासाठी एक पर्याय म्हणून स्थानिक मार्केटस् आणि व्यापाराच्या उपलब्ध होऊ शकणारे नेटवर्क सक्षम करून मदत देऊ.

96. आम्ही सर्व आकारमानाची शहरी क्षेत्रे आणि त्यांची उपनगरे आणि ग्रामीण परिसर, सीमापार असलेल्यांसह, यांच्यात संयुक्त शक्ती आणि परस्परक्रिया यांना प्रोत्साहन देण्यासाठी, शहरी-विभाग आणि महानगरी योजनांसह शाश्वत शहरी आणि परादेशिक नियोजनाच्या अंमलबजावणीला प्रोत्साहन देऊ आणि आम्ही शाश्वत प्रादेशीय संरचना प्रकल्पांना मदत देऊ जे शहरी-ग्रामीण सातत्यामध्ये प्रदेशांच्या न्याय्य वृद्धीचे प्रवर्तन करून, शाश्वत आर्थिक उत्पादकतेल उत्तेजन देतील. या बाबतीत, आम्ही पालिका आणि महानगरी लक्ष्ये पूर्ण करण्याची, सार्वजनिक सेवा देण्याची आणि स्तानिक आणि प्रादेशीय दोन्ही विकासाचे प्रवर्तन करण्याची प्रभावी साधने म्हणून कार्यशील प्रदेश




Hyderabad, Telangana, India - Ryan ©

आणि शहरी क्षेत्रांवर आधारित शहरी-ग्रामीण भागीदारी आणि आंतर-पालिका सहकार्य यंत्रणांचे प्रवर्तन करू.

97. आम्ही नियोजित शहरी आणि विस्तार आणि भरावांचे, प्रोत्साहन देऊहित करणार आणि प्राथमिक रीत्या पुनर्नवीकरण आणि शहरी क्षेत्रातील नवीन कार्याचा आढावा घेऊन, उचित असल्याप्रमाणे यात झोपडपट्टी आणि अनौपचारिक वसाहती समाविष्ट करून, यात उच्च गुणवत्तेतील इमारती आणि सार्वजनिक ठिकाणे पुरवून, हितसंबंधी आणि संबद्ध व्यक्तिंना गुंतवून एकात्मिक आणि सहभागी दृष्टीकोनांचे प्रवर्तन करून अवकाशीय आणि सामाजिक आर्थिक वेगळेपणा आणि जेन्ट्रीफिकेशन टाळून, त्याचबरोबर सांस्कृतिक वारशाचे संवर्धन करून आणि शहरी पसाऱ्याला प्रतिबंध करून आणि मर्यादा घालून प्रवर्तन करू.

98. आम्ही न्याय्य तत्वे, जमीन आणि नैसर्गिक स्रोतांचा कार्यक्षम आणि शाश्वत वापर, सुटसुटीतपणा, बहुकेंद्रीयता, उचित घनता आणि जोडणी, आणि अवकासाचे बहुविध उपयोग, शहरी पसाऱ्याला प्रतिबंध करण्याच्या, चलनवलनाची आव्हाने आणि गरजा आणि दर डोई सेवा पुरवण्याचा खर्च कमी करण्याच्या आणि उचित असल्याप्रमाणे, घनता आणि स्केलच्या अर्थव्यवस्था आणि संचयाचा फायदा घेण्याच्या दृष्टीने एकात्मिक आणि प्रादेशिक नियोजनाचे प्रवर्तन करू.

99. आम्ही जी शहरी नियोजनाची धोरणे सर्वांसाठी दर्जदार पायाभूत सेवा आणि सार्वजनिक ठिकाणांच्या उपलब्धतेसह परवडणाऱ्या घरांच्या तरतूदीमार्फत सामाजिक मिश्रण सुविधाजनक करतात, सुरक्षा आणि सुरक्षिततता वाढवून आणि सामाजिक आणि आंतरपिढी परस्परक्रियेला अनुकूल राहून आणि विविधतेच्या कौतुकासह त्यांना उचित असल्याप्रमाणे मदत देऊ. आम्ही शहरी हिंसेने बाधित क्षेत्रांतील सेवना पुरवणाऱ्या व्यावसायिकांना आणि समुदायांना उचित प्रशिक्षण आणि मदत समाविष्ट करण्यासाठी पावले उचलू.

100. आम्ही उत्तम रीत्या डिजाईन केलेल्या सुरक्षित, पोहोच असलेल्या, हरित आणि दर्जेदार रस्ते आणि इतर सार्वजनिक ठिकाणे जी सर्वांना उपलब्ध आहेत आणि लैंगिक

छळ आणि लिंगाधारित हिंसेसह गुन्हे आणि हिंसेपासून मुक्त आहेत, त्यांना मानवी स्केल आणि रस्त्याच्या पातळीवरील जमिनीचा उत्तम वापर करू देणारे उपाय विचारात घेऊन, औपचारिक आणि अनौपचारिक दोन्ही स्तानिक आणि व्यापारी, तसेच ना-नफा समुदायाच्या उपक्रमांची जोपसाना करून, लोकांना सार्वजनिक ठिकाणी आणून आणि आरोग्य आणि स्वास्थ्य सुधारण्याच्या उद्देशाने चालणे आणि सायतलिंग करणे याचे प्रवर्तन करून तरतूदींना मदत देऊ.

101. आम्ही हरितवायू उत्सर्जन, जागांचे, इमारती आणि बांधकामांचे, सेवा आणि संरचनांचे लवचिकता आधारित आणि हवामान परिणामकारक डिजाइन आणि निसर्ग-आधारित उपाय यांच्यासह आपत्ती कमी करणे आणि हवामान बदल अनुकूलन आणि सौम्यीकरण विचार आणि उपाय यांना वय-आणि लिंग प्रतिसादी शहरी आणि प्रादेशिक विकास आणि नियोजन प्रक्रियांमदध्ये एकात्मिक करू. आम्ही क्षेत्रांच्या दरम्यान सहकार्य आणि समन्वयाचे प्रवर्तन करू आणि चालू आणि भावी सुविधांच्या ठिकामांच्या संबंदातील जोखीम निर्धारणासारख्या, आपत्तीत जोखीम कमी करणे आणि प्रतिसाद आराखडे विकसित करण्याच्या आणि अंमलात आणण्याच्या आणि पर्याप्त आकस्मिकता आणि सुटकेच्या कार्यपद्धती तयार करण्याच्या स्थानिक प्राधीकरणांच्या क्षमता उभारू.

102. आम्ही शहरी नियोजन आणि डिझाइनसाठी क्षमता सुधारण्यासाठी आणि राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक पातळीवर शहरी नियोजनकारांसाठी प्रशिक्षणाच्या तरतूदीसाठी अथक परिश्रम घेऊ.

103. आम्ही शहरी सुरक्षा आणि गुन्हे आणि दहशतवाद आणि दहशतवादाला उपकारक असलेल्या अतिरेकी हिसेसह हिंसेच्या प्रतिबंधासाठी सर्वसमावेशक उपाय एकात्मिक करू. असे उपाय, उचित असतील तिथे, सार्वजनिक सुरक्षा आणि गुन्हे आणि हिंसेला प्रतिबंधाशी संबंधित धोरणांच्या विकासात झोपडपट्टी आणि अनौपचारिक वसाहतींमधील घटक तसेच बळी पडण्याची शक्यता आणि सांस्कृतिक घटक संबंधित स्थानिक समुदायाला आणि गैर-सरकारी कार्यकर्त्यांना गुंतवू, ज्यात अंगभूतपणे अधिक मोठा सुरक्षा धोका असणारा म्हणून विशिष्ट गटांच्या कलंकीत करण्याला प्रतिबंध करणे आणि सामना करणे समाविष्ट आहे.

104. आम्ही कायदेशीर गरजांना पूर्ण करत सशक्त, सर्वसमावेशक व्यवस्थापकीय फ्रेमवर्क आणि उत्तरदायी संस्था, ज्या जमीन नोंदणी आणि शासन यांचा व्यवहार करतात त्यांच्या मार्फत, जमिनीचे पारदर्शक आणि शाश्वत व्यवस्थापन आणि वापर, जमीन नोंदणी आणि भक्कम वित्तीय यंत्रणा लागू करून कायदेशीर आवश्यकतंच्या अनुपालनाचे प्रवर्तन करू. शाश्वतआम्ही स्थानिक सरकार आणि संबद्ध हितसंबंधींना कॅडास्ट्रेस, मूल्यांकन, आणि जोखीम नकाशे, आणि जमीन आणि घरांच्या किंमतीच्या नोंदी, सारखी मूलभूत जमीन वस्तूसूची माहिती विकसित करण्यात आणि वापरण्यात, उच्च दर्जा, वक्तशीर आणि विश्वासार्ह डेटा- उत्पन्न, लिंग, वंश, वांशिकता, स्थलांतरणाची स्थिती, अपंगत्व, भौगोलिक स्थान आणि राष्ट्रीय संदर्भात संबंधित इतर गुणवैशिष्ट्ये याद्वारा वेगळा केलेला-हा डेटा भेदभाव करणाऱ्या जमिन वापराच्या धोरणांसाठी वापरला जाणार नाही याची खात्री करून- निर्माण करण्यासाठी विविध यंत्रणांमार्फत मदत देऊ.

105. आम्ही पर्याप्त जीवनमानाचा एक घटक म्हणून पर्याप्त घराचा हक्क प्रागतिकतेने वास्तवात उतरण्याची आम्ही जोपासना करू. आम्ही राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक विकास धोरणे जमीन दोरणे आणि घरांचा पुरवठा यामध्ये स्पष्टपणाची खात्री करण्यासाठी, उचित असल्याप्रमाणे, सहभागी नियोजन अंतर्भूत करून आणि एकतेचे तत्त्व लागू करून, सर्व पातळ्यांवर गृहनिर्माण धोरणे विकसित करू आणि अंमलात आणू.

106. आम्ही सामाजिक सहभाग, आर्थिक परिणामकारकता आणि पर्यावरणविषयक संरक्षणाच्या तत्त्वांवर आधारित असलेल्या गृहनिर्माण धोरणांचे प्रवर्तन करू. शहरांच्या मध्यवर्ती आणि गर्दीच्या भागातील, पुरेशा संरचना असलेल्या जमिनींसह,परवडणाऱ्या आणि शाश्वत घरांसाठी सार्वजनिक स्रोतांच्या प्रभावी वापराला मदत देतो आणि सामाजिक समावेशकता आणि सुसंगतता प्रवर्तित करण्यासाठी मिश्र-उत्पन्न विकासाला प्रोत्साहन देतो.

107. आम्ही धोरणे, साधने, यंत्रणा आणि वित्तपुरवठ्याची प्रारुपे यांच्या विकासाला प्रोत्साहन देतो जी भाड्याच्या आणि इतर निवासी विकल्पांसह, तसेच सह-निवास,

सामुदायिक जमिनीचे न्यास आणि इतर सामूहिक घरांचे प्रकार जे व्यक्ती आणि समुदायांच्या उभरणाऱ्या गरजांना संबोधित करतील त्याना घरांचा पुरवठा सुधारणे(खास करून अल्प उत्पन्न गटांसाठी), वेगळे पडणे आणि जबरदस्तीने घरातून बाहेर काढणे, आणि विस्तापित होणे याला प्रतिबंध करण्यासाठी आणि प्रतिष्ठीत आणि पुरेसे पुनर्वसन पुरवण्यासाठी, प्रोत्साहन देऊ. यात झोपडपट्ट्यांच्या आणि अनौपचारिक वसाहतींच्या श्रेणीवर्धनाच्या कार्यक्रमांकडे विशेष लक्ष पुरवून, वाढत्या गृहनिर्माणाला आणि स्वतः बांधलेल्या योजनांना मदत समाविष्ट असेल.

108. आम्ही शिक्षण, रोजगार, गृहनिर्माण आणि आरोग्य यांच्या दरम्यानच्या मजबूत दुव्यांना संबोधित करून, वगळणे आणि वेगळे पडण्याला प्रतिबंध करून, स्थानिक एकात्मिक गृहनिर्माण दृष्टीकोनांची जोपासना करणाऱ्या गृनिर्माण धोरणांच्या विकासाला मदत देऊ. त्याच्याही पुढे, आम्ही स्वतः बेघरपणा तसेच समर्पित धोरणांच्या आणि व्यापक, सर्वसमावेशक, आणि शाश्वत हाउसिंग-फर्स्ट कार्यक्रमासारख्या, लक्ष्यित सक्रिय सर्वसमावेशक धोरणांमार्फत त्याच्या गुन्हेगारीकरणाचा सामना करण्यास आणि निर्मूलन करण्यास वचनबद्ध आहोत.

109. झोपडपटट्या आणि अनौपचारिक वसाहती शहरांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि रायकीय आकारमानात एकात्मि केल्या जातील याची खात्री करण्यासाठी शारिरीक आणि पर्यावरणीय सुदारणांच्या पलिकडे जातील असशा धोरणांनी, उचित असल्याप्रमाणे, झोपडपट्ट्या आणि अनौपचारिक वसाहतींच्या श्रेणीवर्धनासाठी आणि शक्य असलेल्या मर्यादेपर्यंत, झोपडपट्ट्या आणि अनौपचारिक वसहतींना प्रतिबंध करण्यासाठी, आर्थिक आणि मानवी स्रोतांच्या वाढीव वाटपाचा आम्ही विचार करू. या धोरणांमध्ये, लागू असल्याप्रमाणे, शाश्वत, पर्याप्त, सुरक्षित आणि पवडणारी घरे, पायाभूत आणि सामाजिक सेवा सर्वसमावेशक, उपलब्ध होऊ शकणाऱ्या, हरित आणि दर्जेदार सार्वजनिक ठिकाणे समाविष्ट असावीत आणि त्यांनी कालावधीची सुरक्षा आणि त्याचे नियमित करणे, तसेच संघर्ष प्रतिबंधक आणि मध्यस्थीचे उपाय यांचे प्रवर्तन करावे.


110. आम्ही झोपडपट्ट्यांमद्ध्ये आणि अनौपचारिक वसाहतींमध्ये राहणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी करण्यासाठी, झोपडपट्टवासी आणि अनौपचारिक वसाहतीतील निवासी

यांचे जीवन सुधारण्याच्या आधीच्या प्रयासातील अनुभव विचारत घेऊन सर्वसमावेशक आणि पारदर्शक देखरेख यंत्रणा निश्चीत करणे आणि अधिक मजबूत करणे यासाठीच्या प्रयासांना मदत देऊ.

111. आम्ही गृहनिर्माण क्षेत्रातील पर्याप्त आणि लागू करता येणाऱ्या नियमनांच्या विकासाचे, उचित असल्याप्रमाणे, लवचिक बिल्डींग कोडस्, प्रमाणने, विकास परवाने, कायद्याने आणि वटहुकुमाने जमिनीचा वापर, आणि नियोजनाची नियमने यासह, हवाल्याशी, विस्थापनांशी, बेघरपणाशी आणि मनमानी जबरदस्तीने बाहेर काढण्याशी सामना करून आणि त्याला प्रतिबंध करून, आणि दर्जा, परवडणे, आरोग्य, सुरक्षा, उपलब्ध होमे, उर्जा आणि स्त्रोतांची कार्यक्षमता, आणि लवचिकतेची खात्री करून प्रवर्तन करू. आम्ही उच्च-दर्जा, वेळेवर आणि विशिष्ट सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि सांस्कृतिक पैलू विचारात घेऊन राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक पातळयांवर विश्वासार्ह डिसअ‍ॅग्रीगेटेड डेटावर आधारित घरांचा पुरवठा आणि मागणीच्या विशिष्ट विश्लेषणाचे सुद्धा प्रवर्तन करू. शाश्वत

112. आम्ही घरे आणि लोकांच्या गरजा धोरणाच्या केंद्रस्थानी ठेवून, परिघीय आणि एकाकी पडलेला सार्वत्रिक गृहनिर्माण विकास शहरी प्रणालींपासून तुटलेला राहणे टाळण्यासाठी चांगल्या ठिकाणी असलेल्या आणि चांगले वितरण केलेल्या गृहनिर्माण योजना, ज्यांच्यासाठी त्या विकसित केलेल्या आहेत त्या सामाजिक आणि आर्थिक क्षेत्राचा विचार न करता, आणि अल्प-उत्पन्न गटांच्या घराच्या गरजांसाठी उपाय पुरवून, शाश्वत शहरी विकासाचे प्रवर्तन करू.

113. आम्ही रस्ते सुरक्षा सुधारण्यासाठी आणि ते शाश्वत चलनवलन आणि वाहतूक संरचना नियोजन आणि डिझाइनमध्ये एकात्मिक करण्यासाठी उपाय योजू. जागरुकता-वाढविण्याच्या पुढाकारांसोबत एकत्रितपणे, आम्ही डिकेड ऑफ ॲक्शन फॉर रोड सेफ्टीमध्ये सुचवण्यात आलेल्या सेफ-सिस्टीम दृष्टीकोनाचे प्रनर्तन करू, ज्यामध्ये सर्व महिला आणि मुलींच्या गरजा, तसेच मुले व युवक, वृद्ध व्यक्ती आणि अपंग आणि असुरक्षित परिस्थितीत राहाणाऱ्या व्यक्तिंची काळजी घेतली जाईल. आम्ही ती धोरणे आणि उपाय स्वीकारण्यासाठी, अंमलात आणण्यासाठी आणि लागू करण्यासाठी काम करू जे आरोग्यविषयक विशाल निष्पत्तीच्या दृष्टीने पादचारी सुरक्षा आणि


Toluca, Mexico

सायकलिंग चलनवलनाला, खास करून दुखापतींना आणि असंसर्गजन्य रोगांना प्रतिबंध करण्यासाठी, सक्रियपणे संरक्षण देतील आणि प्रवर्तन करतील, आणि आम्ही जागतिक स्तरावर मोटरसायकलमुळे प्रामाणाबाहेर होणाऱ्या मृत्यू आणि दुखापतींचा, खास करून विकसनशील देशांत, विचार करता विशिष्ट कायदा आणि धोरणे विकसित करण्यासाठी आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी काम करू. आम्ही प्राधान्याने प्रत्येक मुलाला शाळेपर्यंत सुरक्षित आणि निरोगी प्रवासाचे प्रवर्तन करू.

114. आम्ही सर्वांसाठी एकूण शहरी आणि प्रादेशिक आराखड्यांत वाहतूक आणि चलनवलन योजना एकात्मिक करून आणि खाली दिल्याप्रमाणे वाहतूकीच्या आणि चलनवलनाच्या अनेक पर्यायांचे प्रवर्तन करून शहरातील आणि मानवी वसाहतींतील सामाजिक आणि आर्थिक कृतींमध्ये अर्थपूर्ण सहभाग शक्य करणारी सुरक्षित,वय आणि लिंग प्रतिसादी, परवडणारी आणि शाश्वत शहरी चलनवलन आणि भू आणि समुद्र वाहतूक पद्धतीचे प्रवर्तन करू.

(a) सार्वजनिक वाहतूकीसाठी, तसेच चालणे आणि सायकलिंग अशा यंत्रविरहित पर्यायांसाठी त्यांना खाजगी यांत्रिक वाहतूकीच्या वर प्राधान्य देऊन, उपलब्ध होऊ शकणाऱ्या, सुरक्षित, कार्यक्षम, परवडणाऱ्या आणि शाश्वत संरचनांमध्ये मोठी वाढशाश्वत;

(b) विस्थापन, खास करून गरीबांचे, कमीत कमी करणारा न्याय्य "संक्रमणाभिमुख विकास" आणि परवडणारी वैशिष्ट्य़े, मिश्र-उत्पन्न घरे, नोकऱ्या आणि सेवांचे एक मिश्रण

(c) जलमार्गासह, शहरी, उपनगरी आणि ग्रामीण भागांच्या दरम्यान जोडणी वाढवणारे, प्रवासाची आणि वाहतूकीची गरज कमी करणारे उत्तम आणि समन्वयित वाहतुक व भूमि वापर नियोजन, आणि वाहतूक आणि चलनवलन नियोजन, खास करून छोट्या बेटांची विकसनशील राज्ये आणि किनारी शहरांसाठी

(d) शहरी भाडे नियोजन आणि लॉजिस्टिक्स संकल्पना ज्यामुळे विविध उत्पादने आणि सेवा उपलब्ध होतात, त्यांचा पर्यावरणावरील आणि शहरातील

उपजिवीकेवरील प्रभाव कमी होतो आणि टिकाऊ, सर्वसमावेशक आणि शाश्वत आर्थिक वृद्धीला योगदानात जास्तीत जास्त वाढ होते. शाश्वत

115. आम्ही शहरी आणि महानगरीय वाहतूक योजनांचे, पर्यावरण, अर्थव्यवस्था, सामाजिक सुसंगतता, जीवनमान, उपलब्धता, रस्ते सुरक्षा, सार्वजनिक आरोग्य आणि इतर गोष्टींबरोबरच, हवामान बदलावरील कारवाई यांच्यासह अधिक विशाल फायद्यांचे मूल्यांकन करण्यासाठी राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक पातळ्यांवर यंत्रणा आणि सामायिक चौकटी विकसित करण्यासाठी उपाय योजू.

116. आम्ही शाश्वत, शहरी आणि महानगरीय भागांत वाहतूक आणि चलनवलनाच्या सेवांच्या वाटून घेतलेल्या चलनवलनाच्या सेवा शक्य करणाऱ्या नवीन तंत्रज्ञानासह, खुल्या आणि पारदर्शक प्रापण आणि नियमनासाठी, शाश्वत राष्ट्रीय शहरी वाहतूक आणि चलनवलन धोरणांवर आधारित, या यंत्रणा आणि चौकटींच्या विकासाला मदत देऊ. आम्ही स्थानिक सरकारेआणि वाहतूक आणि चलनवलन सेवा पुरवठादार यांच्या दरम्यान, डेटा व्यवस्थापनासह, एक स्पष्ट, पारदर्शक आणि उत्तरदायी करारीकृत संबंध विकसित करण्याला मदत देऊ, जे सार्वजनिक हितांचे आणि व्यक्तीगत खाजगीपणाचे आणखी संरक्षण करतील आणि परस्पर कर्तव्ये निश्चीत करतील

117. आम्ही राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक पातळ्यांवर, शाश्वत शहरी आणि महानगरीय वाहतूक आणि चलनवलन आराखड्यासह, नियोजन आणि धोरण चौकटींच्या परस्पर सामंजस्यात, वाहतूक आणि शहरी आणि प्रादेशिक नियोजन विभागांमध्ये अधिक समन्वयाला मदत देऊ. आम्ही उपराष्ट्रीय आणि स्थानिक सरकारांना आराखड्यांची अंमलबजावणी करणयासाठी आणि लागू करण्यासाठी आवश्यक ते ज्ञान आणि क्षमता विकसित करण्यात मदत देऊ.

118. आम्ही राष्ट्रीय, उपनगरीय आणि स्थानिक स्वराज्य सरकारांना कार्यक्षमता, जोडणी, उपलब्धता, आरोग्य आणि जीवनाचा दर्जा सुधारतानाच, कोंडी आणि प्रदूषण कमी करण्यासाठी त्यांच्या मास रॅपिड-ट्रान्झीट सिस्टीम, एकात्मिक वाहतूक प्रणाली, हवाई आणि रेल प्रणाली, आणि सुरक्षित, पर्याप्त आणि पुरेसे पादचारी आणि सायकलिंग

संरचना आणि वाहतूक आणि प्रवासातील तंत्रज्ञान आधारित प्रणाली अशा वाहतूक आणि चलनवलन पायाभूत सुविध आणि प्रणाली सुधारणे शक्य होण्यासाठी वित्तपुरवठा साधने विकसित आणि विस्तारित करण्याला प्रोत्साहन देऊ.

119. आम्ही पाण्याशी- संबंधित आपत्तीच्या प्रसंगात सुरक्षितता सुधारण्यासाठी, आरोग्य सुधारण्यासाठी, सर्वांसाठी पाण्याच्या सुरक्षित आणि परवडणाऱ्या वैश्विक आणि न्याय्य उपलब्धतेची खात्री करण्यासाठी तसेच, असुरक्षित परिस्थितीतीलमहिला आणि मुलींच्या गरजा आणि सुरक्षितता याकडे विशेष लक्ष देऊन, खुल्यावर शौच करण्याची समाप्त करण्यासाठी, पाणी, स्वच्छता आणि मलनिःसारण, घन कचरा व्यवस्थापन, शहरी मलवाहिन्या, हवा प्रदूषण कमी करणे आणि स्टॉर्म वॉटर व्यवस्थापनसाठी संरक्षक, उपलब्ध होऊ शकणाऱ्या, आणि शाश्वत संरचना आणि सेवा तरतूद प्रणालींमध्ये पुरेशा गुंतवणकींचे प्रवर्तन करू. आम्ही ही संरचना हवामानाप्रती लवचिक असेल आणि ती इतर गोष्टींबरोबरच, गृहनिर्माण आणि चलनवलनासह एकात्मिक शहरी आणि प्रादेशिक विकास आराखड्याचा एक भाग असेल आणि तिची अंमलबजावणी कल्पक, स्रोत-कार्यक्षम, उपलब्ध होणारी, संदर्भ- विशिष्ट आणि सांस्कृतिक दृष्ट्या संवेदनशील शाश्वत उपाय विचारात घेऊन, सहभागी पद्धतीने केली जाईल असे पाहू.

120. आम्ही हळूहळू विषमता नष्ट करण्याचे आणि सर्वांसाठी परवडणाऱ्या पिण्याच्या पाण्याची सार्वत्रिक आणि न्याय्य दोन्ही उपलब्धता आणि सर्वांसाठी पुरेशा आणि न्याय्य स्वच्छता आणि आरोग्यशास्त्राच्या प्रवर्तनाचे लक्ष्य ठेवून, क्षमता विकासामार्फत, शहरी संरचना सेवांच्या देखभालीसह शाश्वत जल व्यवस्थापन प्रणालींची अंमलबजावणी करण्यासाठी क्षमतेने सार्वजनिक पाणी आणि स्वच्छता उपयोगितांना सुसज्ज करण्यासाठी काम करू.

121. आम्ही उर्जा कार्यक्षमता आणि शाश्वत नूतनीकरणीय उर्जेचे प्रवर्तन करून आणि सार्वजनिक इमारती, संरचना आणि सुविधांमध्ये, जिथे लागू असेल तिथे, तसेच उपराष्ट्रीय आणि स्थानिक संरचनांच्या स्थानिक सरकारांद्वारे थेट नियंत्रणाचा फायदा घेऊन निवासी, व्यापारी आणि औद्योगिक इमारती, उद्योग, वाहतूक, कचरा आणि स्वच्छता अशा अंतिम-उपभोक्ता क्षेत्रांत जोपासना करण्यासाठी परवडणाऱ्या, विश्वासार्ह आणि

आधुनिक सेवा क्षेत्रांच्या सार्वत्रिक उपलब्धतेची खात्री करू. आम्ही उर्जा-सक्षमता उद्दिष्टे गाठण्यासाठी बिल्डींग कामगिरी कोडस् आणि प्रमाणने, नूतनीकरणीय पोर्टफोलिओ उद्दिष्टे, उर्जा-कार्यक्षमता लेबलिंग, विद्यमान इमारतींचे रिट्रोफिटिंग आणि उर्जेच्या आणि उचित असल्याप्रमाणे, इतर पद्धतींमधील जाहीर प्रापणाच्या बाबतीत धोरणांना प्रोत्साहन देऊ. आम्ही नूतनीकरणीय उर्जा आणि उर्जा कार्यक्षमता यांच्या दरम्यानची एकत्रित शक्ती सुधारण्यासाठी स्मार्ट-ग्रीड, जिल्हा उर्जा प्रणाली आणि समुदाय उर्जा आराखड्यांना प्राधान्य देऊ.

122. टिकाऊ कचरा व्यवस्थापन प्रणालीच्या सार्वत्रिक उपलब्धतेला प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही कचरा विल्हेवाटीवर विकेंद्रीकृत निर्णयासाठी सहाय्य करू. आम्ही वाढीव उत्पादक-जबाबदारी योजनांचे समर्थन करणार आहोत ज्यामध्ये कचरा जनरेटर आणि निर्मात्यांना शहरी कचरा व्यवस्थापन यंत्रणेस वित्तपुरवठा करणे, कचरा सांडण्याच्या धोक्यात व सामाजिक आर्थिक परिणाम कमी करणे आणि चांगल्या उत्पादनांच्या डिझाईनद्वारे पुनर्नवीकरणाच्या दरात वाढ करणे समाविष्ट आहे.

123. आम्ही उपाशी असलेल्या लोकांना अन्न देणे आणि कुपोषण समाप्त करण्यासाठी, अन्न सुरक्षा आणि शहरी रहिवाशांच्या, विशेष करुन शहरी गरीबांच्या, पोषणविषयक गरजा, शहरी व प्रादेशिक नियोजनात एकात्मिक करण्याचे ला प्रवर्तन करू. आम्ही अन्नाची नासाडी आणि खराब अन्न पुन्हा वापरण्याला प्रतिबंध करण्यासाठी सर्व शहरी, उपनगरी आणि ग्रामीण भागात अन्नाचे उत्पादन, साठा, वाहतूक आणि ग्राहकांना पुरेशा आणि परवडणाऱ्या मार्गाने विकण्यासाठी शाशक्त अन्न सुरक्षा आणि कृषी धोरणांच्या समन्वयाचे प्रवर्तन करू. आम्ही त्यापुढे उर्जा, पाणी, आरोग्य, वाहतूक आणि कचरा धोरणांबरोबर अन्न धोरणाच्या समन्वयाचे प्रवर्तन करू, बियाण्यांची जनुकीय विविधता राखू, घातक रसायनांचा वापर कमी करू आणि कार्यक्षमता कमाल वाढवण्यासाठी कचरा कमीत कमी करण्यासाठी शहरी भागांत इतर धोरणांची अंमलबजावणी करू.

124. आम्ही सांस्कृतिक वारसा आणि लँडस्केपस् यांच्या मूर्त आणि अमूर्त अशा विविध श्रेणी सुरक्षित राखणारे बृहत आराखडे, झोनिंग मार्गदर्शक तत्त्वे, बिल्डींग कोडस्, किनारा व्यवस्थापन धोरणे आणि पवित्रात्मक विकास धोरणांसह, योजना सलेखांच्या स्वीकृतीत शहरी आराखडे आणि धोरणांच्या घटकांना एक संस्कृती म्हणून समावेश करू आणि त्यांचे संभाव्य शहरी विकासाच्या विध्वंसक परिणामांपासून संरक्षण करू.

125. शाश्वत शहरी विकासासाठी सांस्कृतिक वारशाला बळ देण्यासाठी मदत करू आणि त्याची सहभाग आणि जबाबदारीला उत्तेजन देण्यातील भूमिका मान्य करू. आम्ही मूल्य निर्मितीच्या उद्देशाने, सन्माननीय पुनरुज्जीवन आणि अनुकूलनामार्फत, वास्तूशास्त्रीय ल्मारके आणि स्थळांच्या कल्पक आणि शाश्वत वापराचे प्रवर्तन करू. आम्ही मूर्त आणि अमूर्त सांस्कृतिक वारशाच्या माहितीचे प्रवर्तन आणि प्रसार आणि पारंपरिक अभिव्यक्ती आणि भाषा यांच्या संरक्षणात, नवीन तंत्रज्ञान आणि तंत्राच्या वापरामार्फत सह, अंतर्देशीय लोकआणि स्थानिक समुदायांना गुंतवू.

*अंमलबजावणीची साधने*

126. आम्ही मान्य करतो की नवीन शहरी कार्यसूचीच्या अंमलबजावणीसाठी सक्षम करणारे पर्यावरण आणि विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवीन उपक्रम यांची उपलब्धता आणि रस्पर सहमत अटींवर वाढीव ज्ञान-भागीदारी, तसेच क्षमता विकास आणि वाढविणे आणि विकसित आणि विकसनशील

देशांच्या वचनबद्धता, आणि जागतिक, विभागीय, राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक पातळयांवर उपलब्ध असलेल्या पारंपरिक आणि कल्पक स्रोतांचा वापर करून, तसेच सरकारच्या सर्व स्तरांवर, खाजगी क्षेत्र, नागरी समाज, सयुक्त राष्ट्रे प्रणाली आणि इतर कार्यकर्ते, यांच्यातील वाढीव आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि भागीदाऱ्या, समनता, विना-भेदभाव, उत्तरदायित्व, मानवी हक्क आणि एकतेप्रती आदराच्या तत्त्वांवर आधारित, खास करून जे सर्वात गरीब आणि असुरक्षित आहेत, हे सर्व विचारात घेऊन आवश्यक आहे.

127. आम्ही 2030 शाश्वत विकासासाठीची कार्यसूची आणि अदिस अबाबा कृती कार्यसूचीत समाविष्ट केलेल्या अंमलबजावणीच्या साधनांवरील वचनांचा पुन्हा एकदा निश्चय करतो.

128. आम्ही सदस्य राष्ट्रे, स्थानिक प्राधीकरणे, महत्त्वाचे गट आणि इतर हितसंबंधी यांच्याबरोबर जवळच्या समन्वयाने, तसेच तज्ज्ञांना चालना देऊन, नवीन शहरी कार्यसूची आणि शाश्वत विकास लक्ष्यांचे शहरी पैलू यांच्या अंमलबजावणीसाठी पुरावा-आधारित आणि वास्तव मार्गदर्शन निर्माण करण्यासाठी यूएन-हॅबिटाट, इतर




Tel Aviv, Israel - Boris-B ©

संयुक्त राष्ट्रे कार्यक्रम आणि एजन्सीज आणि इतर संबंधित हितसंबंधींना प्रोत्साहन देतो. आम्ही हॅबिटाट ।।। परिषदेच्या वारशावर आणि विभागीय आणि थीमॅटिक सभांसह, तयारीच्या प्रक्रियांमध्ये शिकलेल्या अनुभवांवर उभारणी करू. या संदर्भात आम्ही, इतर बाबींबरोबरच, वर्ल्ड अर्बन कँपेन दि जनरल असेंब्ली फॉर हॅबिटाट ।।। आणि ग्लोबल लँड टूल नेटवर्कचया मूल्यवान योगदानाची नोंद घेतो.

129. आम्ही यूएन-हॅबिटाटला त्यांचे नमुनात्मक ज्ञान विकसित करण्याचे आणि राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक सरकारांना डिजायनिंग, नियोजन आणि शाश्वत शहरी विकासाचे व्यवस्थापन करण्यातील क्षमता विकास आणि साधने पुरवण्याचे काम चालू ठेवण्याची विनंती करतो

130. आम्ही मान्य करतो की, उचित असल्याप्रमाणे, प्रचलित शहरी धोरणे आणि पवित्र्यांनी मार्गदर्शित केलेल्या, शाश्वत नागरी विकासाला सर्व पातळयांवर सक्षम करणाऱ्या पर्यावरणाचा आधार असलेल्या एकात्मिक वित्तपुरवठय़ांपासून फायदा होऊ शकेल. आम्ही अंमलबजावणीची सर्व वित्तीय साधने ठोस धोरणात्मक फ्रेमवर्क आणि वित्तीय विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेत, जिथे उपलब्ध आहेत, आणि सर्व स्तरांवर पुरेशी क्षमता विकसित केली आहे, त्यात दृढतेने सुनिश्चित करण्याचे महत्त्व मान्य करतो.

131. आम्ही शाश्वत शहरी विकास साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या विशिष्ट साधनांचा आणि तंत्रज्ञानाचा स्वीकार करुन शासनाच्या सर्व स्तरांवर आर्थिक व्यवस्थापन क्षमता वाढविण्यासाठी संदर्भ-संवेदनशील दृष्टीकोनांना मदत देतो, हे मान्य करून की प्रत्येक देशाची स्वतःच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाची प्राथमिक जबाबदारी आहे.

132. शहरी विकासाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आणि अतिरिक्त स्रोतांच्या खुल्या उपलब्धतेच्या दृष्टीने, हे मान्य करून की, सर्व देशांसाठी, राष्ट्रीय मालकीच्या तत्त्वांनी अंगावर पडलेले, सार्वजनिक धोरणे आणि घरगुती स्रोतांना चालना देणे आणि त्यांचा परिणामकारक वापर करणे, नवीन शहरी कार्यसूचीच्या अंमलबजावणीसह शाश्वत शहरी विकासाच्या आपल्या सामायिक पाठपुराव्यासाठी केंद्रस्थानी आहेत, शहरीकरणाच्या फायदे मिळवण्यातून निर्माण झालेलेल अंतर्गर्भीय स्रोत आणि महसूल,

तसेच सार्वजनिक आणि खाजगी गुंतवणूकींचे कॅटलायझिंग परिणाम आणि जास्ती जास्त केलेले परिणाम यांना आम्ही चालना देऊ.

133. आम्ही खाजगी व्यवसाय कार्य, गुंतवणूक आणि कल्पकता हे उत्पादकता, सर्वसमावेशक वृद्धी आणि नोकऱ्या निर्मितीचे प्रमुख चालक आहेत आणि की खाजगी गुंतवणूक, खास करून एका स्थिर आंतरराष्ट्रीय आर्थिक प्रणालीबरोबरच विदेशी थेट गुंतवणूक, विकासाच्या प्रयासांचे अत्यावश्यक घटक आहेत हे कबूल करून व्यावसायिकांना शहरी क्षेत्रातील शाश्वत विकासाची आव्हाने सोडवण्यासाठी त्यांची सर्जनशीलता आणि कल्पकता लागू करण्यासाठी आव्हान करतो.

134. आम्ही उपराष्ट्रीय आणि स्थानिक सरकारांना, महिला आणि मुली, बालके आणि तरुण, वयोवृद्ध व्यक्ती, अपंगत्व असलेल्या व्यक्ती, अंतर्देशीय लोक आणि स्थानिक समुदाय प्रभावीत होणार नाहीत याची खात्री करून त्यांच्या संभाव्य महसूल पायाची नोंद आणि विस्तार करण्यासाठी, उदाहरणार्थ, राष्ट्रीय धोरणांच्या अनुषंगाने, बहुआयामी कॅडास्ट्रेसेस, स्थानिक कर, शुल्के आणि सेवा आकार, मदत देऊ.

135. आम्ही स्थानिक सरकारला पर्याप्त, वेळच्या वेळी आणि अंदाज करता येणारे स्रोत पुरवण्यासाठी आणि त्यांची महसूल उभारण्याची आणि खर्चाचे व्यवस्थापन करण्याची क्षमता वाढवण्याच्या दृष्टीने त्यांच्या गरजा, प्राधान्ये, कार्ये, जनादेश आणि उचित असल्याप्रमाणे कामगिरी-आधारित प्रोत्साहने, यांच्या आधारे राष्ट्रीय आणि उपराष्ट्रीय सरकारकडून आर्थिक हस्तांतरणासाठी भक्कम आणि पारदर्शक प्रणालीचे प्रवर्तन करू.

136. आम्ही उपराष्ट्रीय प्रदेशातील, शहरी केंद्रांच्या आत आणि शहरी आणि ग्रामीण भागांच्या दरम्यान, विषमता कमी करण्यासाठी, तसेच एकत्रित आणि संतुलित क्षेत्रीय विकासाला चालना देण्यासाठी आर्थिक स्रोतांच्या व्हर्टिकलआणि हॉरिझाँटल अशा वितरणाच्या दोन्ही प्रकारच्या मॉडेल्सच्याविकासाला समर्थन देऊ. या बाबतीत, न्याय आणि अवकाशीय एकात्मिकतेच्या दिशेने प्रगतीचे निर्धारण करण्यासाठी एक साधन म्हणून खर्च करणे आणि स्रोतांच्या वाटपावरील डेटाची पारदर्शकता सुधारण्याच्या महत्त्वावर आम्ही भर देतो.

137. शहरी विकास प्रक्रिया, पायाभूत प्रकल्प आणि सार्वजनिक गुंतवणुकीचा परिणाम म्हणून निर्माण झालेल्या जमीन आणि मालमत्तेच्या किंमती प्रतिबिंबीत होण्यासाठी

आणि वाटून घेण्यासाठी आम्ही सर्वोत्तम पद्धतींचे प्रवर्तन करू. त्यांच्या केवळ एकट्या खाजगी ताब्याला, तसेच जमीन आणि स्थावर मालमत्तेच्या हवाला व्यवहारांना प्रतिबंध करण्यासाठी, उचित असल्याप्रमाणे, लाभ-संबंधित आर्थिक धोरणे यासारख्या उपाय अंमलात आणले जाऊ शकतात. आम्ही आर्थिक प्रणाली आणि आणि शहरी नियोजन दरम्यानचा तसेच जमीन बाजारपेठ नियमनांसह शहरी व्यवस्थापन साधनांच्या दरम्यानचा दुवा अधिक मजबूत करु. जमिनीवर आधारीत वित्तपुरवठा करण्याचा प्रयासांचा परिणाम जमिनीच्या शाश्वत वापर आणि उपभोगावर होणार नाही याची खात्री करण्यासाठी आम्ही काम करू.

138. आम्ही खुल्या आणि न्याय्य निविदा प्रक्रियांच्या, प्रापण यंत्रणांच्या आणि अंदाजपत्रकाच्या विश्वासार्ह कार्यान्वयनाच्या, तसेच राष्ट्रीय धोरणाला अनुरुप निष्ठा, उत्तरदायित्व, प्रभावी व्यवस्थापन आणि सार्वजनिक मालमत्तेची आणि जमिनीची उपलब्धता यांच्या प्रवर्तनासाठी भ्रष्टाचार-विरोधी उपायांच्या समर्थनार्थ, उचित असल्याप्रमाणे कायदेशीर नियंत्रण आणि सार्वजनिक सहभागाच्या आधारे, स्थौनिक गुंतवणूक आणि प्रकल्पांची आवश्यकता आणि प्रभाव यांचे निर्धारण करण्यासाठी पारदर्शक आणि उत्तरदायी खर्च नियंत्रण साधनांची अंमलबजावणी करण्यात आम्ही उपराष्ट्रीय आणि स्थानिक सरकारांना मदत देऊ.

139. टिकाऊ कर्ज व्यवस्थापनाच्या आधारावर, स्थानिक ऋणयोग्यतेच्या मार्गाने, तसेच उचित असेल तेव्हा विस्तारित शाश्वत म्युनिसिपल डेट मार्केटच्या मार्गाने पुरेसा महसूल आणि क्षमतांच्या पाठबळावर, शाश्वत राष्ट्रीय आणि पालिका ऋणांसाठी कणखर कायदेशीर आणि नियामक चौकटीच्या निर्मितीला आम्ही मदत देऊ. शहरी वित्तपुरवठ्यासाठी संचयित वित्तपुरवठा यंत्रणेसह राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक विकास निधी किंवा विकास बँका, या सारख्या उचित वित्तीय मध्यस्थ स्थापन करण्याचा आम्ही विचार करू जे सार्वजनिक आणि खाजगी, राष्ट्रीय आणि अंतरराष्ट्रीय वित्तपुरवठा उत्प्रेरित करू शकतील. आम्ही चलनाच्या जोखमीचे व्यवस्थापन करताना, भांडवलाचा खर्च कमी करण्यासाठी आणि जोखीम हस्तांतरण यंत्रणेपर्यंत पोहोचसह शाश्वत शहरी विकासात आणि लवचिकता उभारणी प्रयासांत खाजगी क्षेत्राला आणि कुटुबांना उत्तेजन देण्यासाठी, बहुपक्षीय गुंतवणूक हमी एजन्सीसारख्या जोखमी सौम्यीकरण यंत्रणेचे प्रवर्तन करण्यासाठी काम करू.

140. आम्ही योग्य आणि परवडणाऱ्या गृह वित्तपुरवठा प्रॉडक्टसच्या विकासास समर्थन देऊ आणि बहुपक्षीय आर्थिक संस्था, प्रादेशिक विकास बँका आणि विकास वित्त संस्था, सहकारी एजन्सीज, खाजगी क्षेत्रातील धनकोआणि गुंतवणूकदार, सहकारी संस्था, सावकारांच्या विविध श्रेणींना सहभागी होण्यास आणि सूक्ष्म वित्त संस्थांना परवडणाऱ्या आणि वाढत जाणाऱ्या गृहनिर्माण क्षेत्राच्या सर्व प्रकारांत गुंतवणूक करण्यासाठी प्रोत्साहन देऊ.

141. सार्वजनिक अनुदानांपासून इतर सार्वजनिक संस्था आणि खाजगी क्षेत्राकडील योगदाने यांसह विविध निधीपुरवठा स्रोतांच्या आधारे, कार्यकर्त्यांच्यामधील समन्वय आणि हस्तक्षेप तसेच उत्तरदायित्व यांची खात्री करून, राष्ट्रीय स्तरावर शहरी आणि प्रादेशिक वाहतूक संरचना आणि सेवा निधी स्थापित करण्याचा सुद्धा आम्ही विचार करू.

142. आम्ही आंतरराष्ट्रीय बहुपक्षीय आर्थिक संस्था, प्रादेशिक विकास बँका, विकास वित्त संस्था आणि सहकार्य एजन्सी यांना नवीन शहरी कार्यसूचीच्या अंमलबाजवणीसाठी, खास करून विकसनशील देशांत, कार्यक्रम आणि प्रकल्पांना, कल्पक आर्थिक यंत्रणांसह, आर्थिक पाठबळ पुरवण्यासाठी आमंत्रित करतो.

143. आम्ही ग्रीन क्लायमेट फन्ड, ग्लोबल एन्व्हायर्नमेंट फॅसिलिटी, एडॉप्टेशन फंड आणि क्लायमेट इनव्हेस्टमेंट फंड्स यांच्यासह जलवायु परिवर्तन संबंधी उपनगरीय योजना, धोरणे, कार्यक्रम आणि उपनगरीय व अन्य कार्यक्रमांसाठी विविध बहुपक्षीय निधीच्या प्रवेशाला, हवामान बदल अनुकूलन आणि सौम्यीकरण योजना, धोरणे, कार्यक्रम, आणि सहमत कार्यपद्धतीच्या आतील चौकटीत, उपराष्ट्रीय आणि स्थानिक सरकारांसाठी कारवाईसाठी स्रोत लुरक्षित करण्यासाठी मदत देतो. मदतआम्ही उचित असल्याप्रमाणे, उपराष्ट्रीय आणि स्थानिक आर्थिक संस्थांबरोबर, हवामान वित्तपुरवठा संरचना उपाय विकसित करण्यासाठी आणि सरकारच्या सर्व पातळयांवर आर्थिक आणि ऋण शाश्वततेची खात्री करण्यासाठी कोणत्याही राष्ट्रीय चौकटीशी सातत्य राखून, उत्प्रेरकीय आर्थिक संस्था निश्चीत करण्यासाठी समन्वय राखू.

144. आम्हीशहरी आणि महानगरीय पायाभूत सुविधा, इमारती आणि इतर शहरी संपत्तीमधील गुंतवणुकीशी संबंधित विमा आणि पुनर्विमा संस्था आणि इतर संबंधित कार्यकर्तेयांच्याशी समन्वय राखून सहकार्याने, शहरी आणि मानवी वसाहतीमध्ये हवामान आणि आपत्ती जोखमींवर, तसेच स्थनिक लोकसंख्येसाठी त्यांचा निवारा आणि

आर्थिक गरजा सुरक्षित करण्यासाठी, व्यवहार्य उपायांचा धांडोळा घेऊ आणि विकसित करू.

145. शाश्वत शहरी आणि प्रादेशिक विकासासाठी, सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील सर्व उपलब्ध स्त्रोतांकडून, इतर गोष्टींबरोबरच, अतिरिक्त संसाधनांच्या चालनेला उत्प्रेरित करण्यासाठी, अधिकृत विकास सहाय्यांसह आंतरराष्ट्रीय सार्वजनिक वित्तपुरवठ्याचा वापर करण्याचे आम्ही समर्थन करतो. यामध्ये आंतरराष्ट्रीय सार्वजनिक वित्तपुरवठा सार्वजनिक स्रोतांच्या अंतर्देशीय स्तरावर चालना देणाऱ्या देशांच्या, खास करून अत्यंत गरीब आणि मर्यादित अंतर्देशीय स्रोत असलेले असुरक्षित देशांच्या प्रयासांना जोड देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात ही वस्तुस्थिती मान्य करून, संभाव्य गुंतवणूकदारांसाठी जोखीमांच्या सौम्यीकरणाचा समावेश असू शकतो.

146. आम्ही उत्तर-दक्षिण, दक्षिण-दक्षिण व त्रिकोणीय प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य, तसेच उचित असल्याप्रमाणे, उपनगरीय, विकेंद्रित आणि शहर-ते-शहर संबंधी सहकार्य करणारे प्रकार, शाश्वत शहरी विकासासाठी, क्षमता विकसित करण्यासाठी आणि शहरी विकासाला योगदान देण्यासाठी आणि सर्व स्तरांवर आणि सर्व संबंधित कार्यकर्त्यांद्वारे शहरी उपाय आणि परस्पर शिक्षणाची जोपासना करून संधींचा विस्तार करू.

147. आम्ही शासनाच्या सर्व स्तरांवरील बहुविध हितसंबंधी आणि संस्थांच्या क्षमतांना संबोधित करणारा आणि शाश्वत शहरी विकासासाठी सार्वजनिक धोरणे तयार करण्यासाठी, अंमलबजावणी करण्यासाठी, वाढवण्यासाठी, व्यवस्थापन करण्यासाठी, देखरेख करण्यासाठी आणि मूल्यांकन करण्यासाठी व्यक्तीगत, समाजविषयक आणि संस्थात्मक क्षमतांचा संयोग करणारा बहुआयामी दृष्टिकोन म्हणून क्षमता विकासाचे प्रवर्तन करू.

148. आम्ही महिला आणि मुली, मुले आणि युवक, वयोवृद्ध व्यक्ती आणि अपंग व्यक्ती, अंतर्देशीय लोक आणि स्थानिक समुदायांबरोबर तसेच नगरी समाज, शैक्षणिक आणि संशोधन संस्था यांच्याबरोबर, त्यांना शहरी आणि प्रादेशिक विकासाच्या संबंधातील निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत प्रभावीपणे सहभागी होणे शक्य करण्यासाठी सघटनात्मक आणि संस्थात्मक शासनाला आकार देण्यात काम करण्यासाठी, उचित असल्याप्रमाणे,

राष्ट्रीय, उपराष्ट्रीय, आणि स्थानिक सरकारी संहयोगी संस्थांसह स्थानिक सरकारांची क्षमता मजबूत करण्याचे प्रवर्तन करू.

149. आम्ही स्थानिक सरकारी संघटनांना क्षमता विकासाचे प्रवर्तक आणि पुरवठादार म्हणून, उचित असल्याप्रमाणे, त्यांची शहरी धोरणे आणि विकासाची प्राधान्ये यावरील राष्ट्रीय संमंत्रणेतील सहभाग आणि नागरी समाज, खाजगी क्षेत्र, व्यावसायिक, शैक्षणिक आणि संशोधन संस्था यांच्याबरोबर, उपराष्ट्रीय आणि स्थानिक सरकारांबरोबरच सहकार्य आणि त्यांची विद्यमान नेटवर्क्स, ओळखून आणि मजबूत करून, क्षमता विकास कार्यक्रम पोचवण्यासाठी मदत देऊ. प्रॅक्टिशनर्स नेटवर्कस् स्थापन करणे आणि सायन्स-पॉलिसी इंटरफेस प्रथां, जागतिक, राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक प्रमाणावर, सहाध्यायी-ते-सहाध्यायी शिकणे, आंतर-पालिका सहकार्यसारख्या, विषय मजकूराशी संबंधित भागीदाऱ्या आणि सहकार्याच्या कृती, या मार्गाने केले जावे.

150. आम्ही अदिस अबाबा कारवाई कार्यसूचीखाली स्थापित केलेल्या आणि 2030 शहरी विकासासाठी शाश्वत कार्यसूची खाली सुर करण्यात आलेल्या टेक्नॉलॉजी फॅसिलिटेशन यंत्रणेच्या प्रक्रियांबरोबर संपूर्ण सुसंगतता, समन्वय आणि संयुक्त शक्तीचा शाश्वत शहरी विकासाला फायदा होण्यासाठीवाढलेले सहकार्य विज्ञान, तंत्रज्ञान आणि कल्पकतेच्या आदान प्रदानाचे महत्त्व आम्ही अधोरिखित करतो.

151. पर्यावरणीय संवेदनशीलता आणि भ्रष्टाचारविरोधी उपाययोजनांसह सर्व स्तरांवर संस्थात्मक सहकार्यात अंतर्भूत केलेल्या आर्थिक नियोजन आणि व्यवस्थापनात उपराष्ट्रीय आणि स्थानिक सरकारांना, पारदर्शक आणि स्वतंत्र दृष्टीकोन, लेखांकन, प्रापण, अहवालीकरण, लेखापरीक्षण आणि इतर बाबींबरोबरच सनियंत्रणाच्या प्रक्रिया अंगीकारून, आणि वय-आणि लिंग प्रतिसादी बजेटिंग आणि लेखांकनाच्या प्रक्रिया आणि नोंदींच्या डिजीटायझेशनकडे विशेष लक्ष देऊन, निष्कर्ष-आधारित दृष्टीकोनांचे प्रवर्तन करणयासाठी आणि मध्यम-ते-दीर्घकालीन प्रशासकीय आणि तांत्रिक क्षमता उभारण्याच्या दृष्टीने प्रवर्तन करू.

152. आम्ही कायदेशीर जमीन-आधारित महसूल आणि विवत्तपुरवठा साधने, तसेच धोरण आखणाऱ्यांसाठी आणि स्थानिक जनसंपर्क अधिकाऱ्यांसाठी स्थावर मालमत्तेच्या कार्यावरील क्षमता विकास कार्यक्रमांचे, जमिनीच्या मूल्यातील वाढींचे राशीकरण, पकडणे आणि वितरण यासह, मूल्य पकडण्याच्या कायदेशीरआर्थिक पायावर लक्ष केंद्रीत करून, प्रवर्तन करू.


Pretoria, South Africa

153. आम्ही स्पष्ट आणि पारदर्शक धोरणे, आर्थिक आणि प्रशासकीय चौकटी आणि कार्यपद्धती, तसेच बहुहितसंबंधी भागीदाऱ्यांसाठी नियोजनाची मार्गदर्शक तत्त्वे स्थापित करून, उचित असल्याप्रमाणे, शहरी विकास प्रक्रियांमध्ये बहु-हिंतसंबंधी भागीदाऱ्यांच्या पद्धतशीर उपयोगाचे प्रवर्तन करू.

154. आम्ही उत्तम प्रथा आणि कल्पक उपायांवर प्रकाश टाकून, तसेच उपराष्ट्रीय एकके. स्थानिक सरकारे आणि इतर संबंधित हितसंबंधी यांच्या दरम्यान सह-उत्पादन नेटवर्कस्च्या प्रवर्तनाद्वारे नवीन शहरी कार्यसूचीचा आरंभ आणि अंमलबजावणी वाढवण्याची योजना असणाऱ्या स्वैच्छिक सहयोगी पुढाकारांचे लक्षणीय योगदान मान्य करतो.

155. आम्ही महिला आणि मुली, मुले आणि तरुण, वयोवृद्ध व्यक्ती आणि अपंगत्व असलेल्या व्यक्ती, अंतर्देशीय लोक आणि स्थानिक समुदाय, तसेच असुरक्षित परिस्थितीतल व्यक्तींची कौशल्ये आणि क्षमता, त्यांच्या शहरी आणि प्रादेशिक विकास निर्णय घेण्यातील प्रभावी सहभागाची खात्री करण्यासाठी शासन प्रक्रियांना आकार देण्यासाठी, संवादात सामील करून घेण्यासाठी, आणि मानवी हक्क आणि भेदभाव-विरोधांचे प्रवर्तन आओणि संरक्षण करण्यासाठी सक्षम करण्यासाठी आणि मजबूत करण्यासाठी क्षमता

**विकास पुढाकारांचे प्रवर्तन करू.**

156. आम्ही महिला आणि मुली, मुले आणि तरुण, वयोवृद्ध व्यक्ती आणि अपंगत्व असलेल्या व्यक्ती, आणि असुरक्षित परिस्थितील व्यक्ती, यांच्यासह जनतेला माहिती आणि संवाद तंत्रज्ञाने उपलब्ध होणयाच्या दृष्टीने नागरी जबाबदारी विकसित करण्यासाठी आणि अंमलात आमण्यासाठी, सहभाग विस्तृत करण्यासाठी, आणि जबाबदार शासनाच्या जोपासनेसाठी, तसेच कार्यक्षमता वाढवण्यासाठी, राष्ट्रीय माहिती आणि संवाद धोरणे आणि इ-गव्हर्नमेंट धोरणे, तसेच क्षमता विकास कार्यक्रमांसह, नागरिक-केंद्रीत डिजीटल शासन साधने, तंत्रशास्त्रीय कल्पकता वापरून पाहणे यांचे प्रवर्तन करू. दीर्घकालीन एकात्मिक शहरी आणि प्रादेशिक नियोजन आणि डिझाइन, भू व्यवस्थापन, आणि शहरी आणि महानगरी सेवांची उपलब्धता सुधारण्यासाठी जोस्पॅटियल माहिती प्रणालींसह डिजीटल व्यासपीठे आणि साधनांच्या वापराला प्रोत्साहन दिले जाईल.

157. आम्ही माहिती, ज्ञान आणि तज्ज्ञता यांच्या संकलन, विश्लेषण, प्रमाणीकरण आणि भौगोलिकदृष्ट्या आधारित, समुदाय-संकलित, उच्च-दर्जा, उत्पन्न, लिंग, वय, वंश, वांशिकता, स्थलांतरण स्थिती, अपंगत्व, भौगोलिक स्थान आणि राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक संदर्भात संबंधित असलेली इतर गुणवैशिष्ट्ये यांच्या द्वारे डिसअॅग्रीगेट केलेला वेळच्या वेळी आणि विश्वासार्ह डेटासह वाटून घेणे आणि आदान प्रदान करणे यासाठी सामाजिक, तंत्रशास्त्रीय, डिजीटल आणि निसर्ग-आधारित कल्पकता, शहरी आणि प्रादेशिक नियोजन आणि धोरण निश्चीती आणि संस्थात्कम केलेल्या यंत्रणा यावर लक्ष केंद्रीत करण्यासह, विज्ञान, संसोधन आणि कल्पकतेला मदत देतो.

158. आम्ही शाश्वत शहरी विकास नीती आणि धोरणांच्या अंमलबजावणीत साध्य केलेल्या प्रगतीवर प्रभावीपणे देखरेख करणे आणि निर्णय-घेणे आणि उचित पुनरावलोकनाची माहिती देणे यासाठी राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक स्तरावर डेटा आणि सांख्यिकीय क्षमता मजबूत करू. नवीन शहरी कार्यसूचीच्या अंमलबजावणीसाठी, पाठपुराव्यासाठी आणि पुनरावलोकनासाठी डेटा संकलन कार्यपद्धती प्राथमिक रित्या अधिकृत राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक डेटा स्रोतांवर, आणि उचित असल्याप्रमाणे इतर स्रोतांवर आधारित असावी, आणि खुली, पारदर्शक आणि खाजगीपणाचा हक्क आणि सर्व मानवी हक्क कर्तव्ये आणि वचनबद्धतांचा आदर करण्याच्या हेतूशी सातत्य राखणारी असावी. शहरे आणि मानवी वसाहतींच्या जागतिक जन-आधारित व्याख्या या कामाला मदत करू शकतील.शाश्वत

159. आम्ही डेटा संकलन, मॅपिंग, विश्लेषण आणि प्रसार करण्यात आणि पुरावा-आधारित शासनाचे प्रवर्तन, जागतिक दृष्ट्या तुलनात्मक तसेच जनगणना, कुटुंबांचे सर्वेक्षण, लोकसंख्या नोंदवह्या, समुदाय-आधारित संनियत्रण क्रक्रिया आणि उत्पन्न, लिंग, वय, वंश,वांशिकता, स्थलांतरण स्थिती, अपंगत्व, भौगोलिक स्थान, आणि राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक संदर्भात संबंधित असलेली इतर गुणवैशिष्ट्ये यांच्या द्वारे डिसअॅग्रीगेट केलेले इतर संबंधित स्रोत अशा दोन्हींचा वापर करून वाटून घेतलेल्या ज्ञानाच्या पायावर उभारणी करण्यात राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक सरकारांच्या भूमिका आणि वाढलेल्या क्षमतांना आम्ही मदत देऊ.


Quito, Ecuador - Ecuadorpostales ©

160. आम्ही गैर-राज्य कारक व लोकांसह राष्ट्रीय, उपनगरीय आणि स्थानिक स्वराज्य सरकारे आणि संबंधित हितसंबंधींमध्ये , इ-गव्हर्नन्स, माहिती आणि संवाद तंत्रशास्त्रांद्वारे सहाय्यित दृष्टीकोन, आ डिओस्पॅटियल माहिती व्यवस्थापनमार्फत प्रभावी शहरी नियोजन आणि व्यवस्थापन, कार्यक्षमता आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी ज्ञान हस्तांतरण आणि वाटून घेण्यासाठी उपलब्ध तंत्रशास्त्रीय आणि सामाजिक साधने वापरून यूजर-मित्र आणि सहभागी डेटा व्यासपीठांची निर्मिती, प्रवर्तन आणि वाढवण्याची जोपासना करू.

*पाठपुरावा आणि पुनरावलोकन*

161. आम्ही एका सर्वसमावेशक पद्धतीने, प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी, परिणामांचे निर्धारण करण्यासाठी आणि कार्यसूचीच्या प्रभावी आणि वेळच्या वेळी अंमलबजावणी, आपल्या नागरिकांना उत्तरदायित्व आणि पारदर्शकता याची खात्री करण्यासाठी राष्ट्रीय, विबागीय आणि जागतिक पातळयांवर सुसंगततेची खात्री करून, नवीन शहरी कार्यसूचीचे पुनरावलोकन करण्यासाठी नियतकालिक पाठपुरावा करू.

162. आम्ही नवीन शहरी कार्यसूचीच्या स्वैच्छिक, देशाच्या पुढाकाराने, खुल्या, सर्वसमावेशक, बहुस्तरीय, शहभागी पाठपुराव्याला आणि पुनरावलोकनाला प्रोत्साहन देऊ प्रक्रियेत सरकारच्या राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक स्तरांच्या योगदानाचा विचार करण्यात यावा आणि संयुक्त राष्ट्रे यंत्रणां, विभागीय आणि उपविभागीय संघटना, मोटे समूह आणि संबंदित हितसंबंधियांच्या योगदानाने तिला जोड देण्यात यावी, आणि ती सर्व संबंधित हितसंबंधियांमध्ये भागीदारीची निर्मिती आणि ठाम अधिक मजबूत करण्याचे लक्ष्य असणारी आणि नागरी उपाय आणि परस्पर शिकवण यांच्या देवाण घेवाणीची जोपासना करणारी प्रक्रिया असावी. शाश्वत

163. आम्ही सर्व स्तरांवर नवीन शहरी कार्यसूचीचा पाठपुरावा करण्यासाठी आणि पुनरावलोकनासाठी सक्रिय भागीदार म्हणून स्थानिक सरकारचे महत्त्व मान्य करतो आणि उचित असल्याप्रमाणे, राष्ट्रीय आणि उपराष्ट्रीय सरकारांबरोबर, संबंधित सहयोगी संस्था आणि उच्ति व्यसपीठांच्या मार्फतसह स्थानिक पातळीवर संयुक्तपणे अंमलबजावणीयोग्य पाठपुरावा आणि पुनरावलोकन यंत्रणा विकसित करण्यासाठी

त्यांना प्रोत्साहन देतो, आम्ही, उचित असेल तिथे, या बाबतीत योगदान देण्याच्या त्यांच्या क्षमतांचा विचार करू.

164. नवीन शहरी कार्यसूचीच्या पाठपुरावा आणि पुनरावलोकनात, त्यांच्या अंमलबाजवणीत समन्वय आणि सुसंगततेची खात्री करण्यासाठी शाश्वत विकासासाठी कार्यसूची 2030 च्या पाठपुरावा आणि पुनरावलोकनाबरोबर प्रबावी दुवे असावेत यावर आम्ही जोर देतो.

165. आम्ही यूएन-हॅबिटाटची, आपल्या दिलेल्या अधिकाराच्या आत, इतर संयुक्त राष्ट्रे यंतर्णा एककांच्या बरोबर समन्वयाने, शाश्वत शहरीकरण आणि इतर बाबींबोरबरच, शाश्वत विकास, आपत्ती जोखीम कपात आणि हवामान बदल यांच्या दरम्यानचे दुवे मान्य करून, शाश्वत शहरीकरण आणि मानवी वसाहतींसाठी एक केंद्रबिंदू म्हणून भूमिका आणि तज्ज्ञता आम्ही पुन्हा मान्य करतो.

166. आम्ही महासभेला सेक्रेटरी-जनरलना देशआणि संबंधित विभागीय आणि आंतरराष्ट्रीय संघटना यांच्याकडील स्वैच्छिक माहितीसह, नवीन शहरी कार्यसूीच्या अंमलबजावणीच्या प्रगतीचा चा पहिला अहवाल सभेच्या बहात्तराव्या सत्रादरम्यान सादर करून, दर चार वर्षांनी सादर करण्याची विनंती करण्यासाठी आमंत्रित करतो.

167. अहवालात नवीन शहरी कार्यसूचीच्या आणि शाश्वत शहरीकरण आणि मानवी वसाहतींच्या संबंधातील आंतरराष्ट्रीय सहमती झालेल्या लक्ष्यांच्या आणि उद्दिष्टांच्या अंमलबजावणीत केलेल्या प्रगतीचे गुणवत्तात्मक आणि राश्यात्मक विश्लेषण मिळेल. हे विश्लेषण राष्ट्रीय, उपराष्ट्रीय आणि स्थानिक सरकार, यू-एन हॅबिटाट, संयुक्त राष्ट्रांच्या यंत्रणेची इतर संबंधित एकके, संबंधित हितसंबंधी यांच्या नवीन शहरी कार्यसूचीच्या अंमलबजावणीच्या लमर्थनार्थ कार्ये आणि यूएन-हॅबिटाट गव्हर्निंग कौंसिलच्या अहवालावर आधारित असतील. अहवालात, शक्य असलेल्या मर्यादेपर्यंत, बहुपक्षीय संघटनांची, उचित असेल तिथे, नागरी समाज, खाजगी क्षेत्र आणि शैक्षणिक क्षेत्र यांच्याकडील माहिती आणि प्रक्रिया, अंतर्भूत करण्यात यावी. तो यूएन-हॅबिटाटद्वारे निमंत्रित जागतिक शहरी मंच सारख्या विद्यमान व्यासपीठांवर आणि प्रक्रियांवर तयार करण्यात यावा. अहवालात प्रतिलिपीकरण टाळावे आणि त्याने राष्ट्रीय, उपराष्ट्रीय परिस्थिती आणि कायदे, क्षमता, गरजा आणि प्राधान्ये यांना प्रतिसाद द्यावा.

168. यूएन-हॅबिटाटद्वारा संयुक्त राष्ट्र यंत्रणेच्या इतर संबंदित एककांबरोबर जवळच्या सहयोगाने, सर्वसमावेशक संयुक्त राष्ट्र निहाय समन्वय प्रक्रियेची खात्री करून समन्वयित केला जाईल. अहवाल महासभेला इकॉनॉमिक अँड सोशल कौंसिलमार्फत सादर केला जाईल,[18] शाश्वत विकासासाठी कार्यसूची 2013 चा पाठपुरावा आणि पुनरावलोकनाबरोबर सुसंगती, समन्वय, सहयोगी दुव्यांची खात्री करून महासभेच्या कृपाछत्राखाली आमंत्रित केल्या जाणाऱ्या शाश्वत विकासावरील उच्च-स्तरीय राजकीय मंचाला सुद्धा सुपूर्द केला जाईल.

169. आम्ही जागतिक वसाहत दिन आणि जागतिक शहर दिन सारख्या विद्यमान पुढाकारांचा वापर करून भागीदारी, तरफदारी आणि जागरुकता वाढवणाऱ्या कृतींच्या माध्यमातून चालना देण्याचे प्रयास सुरू ठेवू आणि नागरी समाज, नागरिक आणि संबंधित हितसंबधींच्या पाठिंब्याला चालना देण्यासाठी आणि निर्माण करण्यासाठी नवीन पुढाकार स्थापित करणयाचा विचार करू. स्थानिक आणि प्रांतीय सरकारंच्या जागतिक सभेत प्रतिनिधीत्व केलेल्या राष्ट्रीय आणि उपराष्ट्रीय आणि स्थानिक सरकार सहयोगी संस्थांबरोबरच्या नवीन शहरी कार्यसूचीचा पाठपुरावा करणे आणि पुनरावलोकन करणे चालू ठेवण्याच्या महत्त्वाची आम्ही नोंद घेतो. शाश्वतशाश्वत

170. आम्ही महासभेच्या 16 डिसेंबर 1976 चा 31/109 आणि 19 डिसेंबर 1977 चा 32/162 सह, 16 डिसेंबर 1996 चा 51/177, 21 डिसेंबर 2001 चा 56/206, 67/216, 68/239 आणि 69/226, ठरावांना पुन्हा मान्य करतो. आम्ही यूएन-हॅबिटाटाच्या नैरोबी मुख्यालयाच्या महत्त्वाचा पुनरुच्चार करतो.

171. आम्ही यूएन-हॅबिटाटची, इतर संयुक्त राष्ट्रे यंत्रणांतील एककांबरोबर सहयोग करून नवीन शहरी कार्यसूचीची अंमलबजावणी, पाठपुरावा आणि पुरावलोकनासह,

[18] हॅबिटाट अॅजेंडाच्या समन्वयित अंमलबजावणीवर सेक्रेटरी-जनरलच्या इकॉनॉमिक अँड सोशल कौंसिलला अहवालाची जागा घेणे हा या अहवालाचा हेतू आहे. त्याचा हेतू, महासभेने तिच्या ठरावात संबंधित अॅजेंडा बाबीखाली विनंती केलेल्या सेक्रेटरी-जनरलच्या अहवालाचा भाग असणे, त्याला अतिरिकत नाही, हा सुद्धा आहे बैठकीचा सभापतींचा सारांश तिच्या वार्षिक ठरावात संबंधित कार्यसूचीच्या बाबीखालील स्वतंत्र निर्धारणात असलेल्या शिफारशींच्या दृष्टीने दुसऱ्या समितीला तिच्या एकाहत्तराव्या अधिवेशनात करावयाच्या कारवाईचा विचार करण्यासाठी माहिती म्हणून काम करेल.

शाश्वत शहरीकरण आणि मानवी वसाहतींवरील केंद्रबिंदू म्हणून महत्त्व अधोरेखित करतो.

172. नवीन शहरी कार्यसूचीच्या दृष्टीने, आणि यूएन-हॅबिटाटची परिणामकारकता वाढवण्याच्या दृष्टीकोनातून, आम्हीसेक्रेटरी-जनरलना महासभेच्या एकाहत्तराव्या अधिवेशनात यूएन-हॅबिटाटचे पुरावा-आधारित आणि स्वतंत्र निर्धारण सादर करण्याची विनंती करतो. निर्धारणाचे निष्कर्ष यूएन-हॅबिटाटची कार्यक्षमता, उत्तरदायित्व आणि दृष्टीक्षेप वाढवण्यासाठी सूचना असलेला एक अहवाल असेल, आणि या बाबतीत त्यांनी पुढील बाबींचे विश्लेषण करावेःअधिवेशनात

(a) यूएन-हॅबिटाटचा नमुनात्मक आणि परिचालनात्मक आदेश;

(b) अधिक प्रभावी, उत्तरदायी आणि पारदर्शक निर्णय घेण्याकरिता यूएन-हॅबिटाटची शासन रचना, त्याच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या सदस्यत्वाच्या सार्वत्रिकीकरणासह विकल्पांचा विचार करणे;

(c) यूएन-हॅबिटाटचे काम राष्ट्रीय, स्थानिक आणि स्थानिक स्वराज्य संस्थांबरोबर, मुख्यत्वाने त्यांची पूर्ण क्षमता मिळवण्यासाठी संबंधित हितसंबंधींच्या बरोबर काम करणे;

(d) यूएन-हेबिटेटची आर्थिक क्षमता

173. आम्ही नवीन शहरी कार्यसूचीची प्रभावी अंमलबजावणी आणि त्या बाबतीत यूएन-हॅबिटाटची स्थिती यांची चर्चा करण्यासाठी एकाहत्तराव्या अधिवेशनाच्या दरम्यान महासभेच्या अध्याक्षांनी बोलवायची महासभेची दोन दिवसांची उच्च स्तरीय बैठक घेण्याचे ठरवले आहे. बैठकीत इतर विषयांबरोबरच, अहवालात असलेल्या उत्तम प्रथा, यशोगाथा आणि उपायांची चर्चा केली जाईल.

174. आम्ही महासभेला पुढील युनायटेड नेशन्स कॉन्फरन्स ऑन हाउसिंग अँड सस्टेनेबल अर्बन डेवलपमेंट (हॅबिटाट IV), 2036 मध्ये नवीन शहरी कार्यसूचीच्या प्रगतीचे निर्धारण आणि मजबूतीकरण करण्यासाठी नूतनीकृत राजकीय वचनबद्धतेच्या आतच घेण्याचा विचार करण्यास प्रोत्साहन देतो.

175. आम्ही सेक्रेटरी-जनरलना वरील परिच्छेद 166 च्या अनुषंगाने 2026 मध्ये सादर करायच्या चतुवार्षिक अहवालात नवीन शहरी कार्यसूचीच्या स्वीकृतीपासून तिच्या अंमलबजावणीत केलेल्या प्रगतीचा आणि सामोरे जावे लागलेल्या आव्हानांचा लेखाजोखा घेण्याची आणि त्यांना संबोधित करण्यासाठी उचलायची पुढील पावले निश्चीत करण्याची विनंती करतो.

HABITAT III

QUITO 17-20 OCTOBER 2016

United Nations Conference on Housing and Sustainable Urban Development

United Nations

**www.habitat3.org**

#NewUrbanAgenda #Habitat3